cmyk

## संपादकीय

### अहंकारी प्रवृत्तीला कानपिचक्या

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही वेगळी आघाडी आहे. भाजपा मोठा पक्ष झाला आहे. संघाची आम्हाला गरज लागत नाही, असे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी निवडणुकी दरम्यान इंग्रजी वृत्तपत्राला मुलाखत देताना म्हटले होते. तेव्हाच भाजप नेतृत्व आणि रा. स्व.संघ यांच्यात काही धुमसते आहे हे लक्षात आले होते. सोमवारी नागपुरात संघ शिक्षा वर्गाच्या समारोपात सरसंघचालकांनी नड्डा अथवा मोदी कुणाचेही नाव न घेता ज्या कानपिचक्या दिल्या आहेत, त्या पाहता भाजपची संख्या स्वबळावर बहुमत का करू शकली नाही हे सर्वांच्या लक्षात आले असेल.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–६४ | शुक्रवार दि.१४ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


### सिक्कीममध्ये मुसळधार, भूस्खलनात १ ठार

नवी दिल्लीः सिक्कीममध्ये मुसळधार पावसाने कहर केला आहे. मंगन आणि उत्तर सिक्कीममधील विविध ठिकाणी प्रचंड आणि विनाशकारी भूस्खलन झाले आहे. यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून, पाच जण बेपत्ता झाले आहेत. सिक्कीममधील मुसळधार पावसामुळे कालिम्पाँग जिल्ह्यातील तीस्ता बाजारजवळ स्ता नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे बाजूला असलेली अनेक घरे पाण्याखाली गेली आहेत. भूस्खलनामुळे सिक्कीममधील अप्पर ग्याथांग आणि तरग गावात मोठ्या प्रमाणा घरे उद्ध्वस्त झाली आहेत. मंगणमधील जिल्हा मुख्यालयाला जोडणारा महत्त्वाचा रस्ताही भूस्खलनानंतर बंद करण्यात आला होता, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# २६६ रुपयांची खताची गोणी ८०० रुपयाला

## कृषी खाते झोपा काढतेय काय? संभाजीराजेंचा सरकारवर हल्लाबोल



पुणे । प्रतिनिधी

राज्यात अनेक भागांमध्ये खते बी–बियाणांमध्ये शेतकऱ्यांची लूट, फसवणूक सुरू आहे. याबाबत राज्य सरकारने तातडीने कार्यवाही केली पाहिजे असे मत स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजीराजे छत्रपती यांनी व्यक्त केले. राज्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांची लूट सुरु असताना कृषीमंत्र्यांनी ग्राउंडवर येऊन काम करणे अपेक्षित आहे. मात्र, हे कृषीमंत्री व्हॉट्सॲपवर, फेसबुकद्वारे जाहीर करुन ऑनलाईन तक्रारी मागवत असल्याचे म्हणत संभाजीराजेंनी धनंजय मुंडेंवर टीका केली. २६६ रुपयांची खताची गोणी ८०० रुपयांना दिली जात




आहे. शेतकऱ्यांना अशाप्रकारे लुटले जात असताना कृषी खाते झोपा काढत आहे का? असा सवाल संभाजीराजेंनी केला आहे. तसेच खते, बी–बियाणांमध्ये शेतकऱ्यांची लूट, फसवणूक करणाऱ्यांवर राज्य सरकारने कारवाई करावी, अशी मागणी संभाजीराजे यांनी केली आहे.

राज्यातील शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असतानाही सरकारचे, राज्यकर्त्यांचे याकडे लक्ष नसल्याची टीका संभाजीराजे यांनी केली आहे. बोगस बी–बियाणे आणि खतांच्या संदर्भात कृषीमंत्र्यांनी जाहीर केलेल्या व्हॉट्सअँप नंबरवरून देखील संभाजीराजे यांनी निशाना साधला आहे. यावेळी संभाजीराजे म्हणाले की, कृषीमंत्र्यांनी अशाप्रकारे व्हॉट्सॲप नंबरवर तक्रारी मागून शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. याची शक्यता वाटत नसल्याच्या तक्रारी आपल्याकडे आल्या आहेत. एकीकडे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लूट होत आहे. तर कृषीमंत्री व्हॉट्सअँप फेसबुकद्वारे तक्रार करा, असे आवाहन करत आहेत. हे योग्य नाही.

संभाजीराजे म्हणाले, राज्यात होणाऱ्या या लूटीबाबत स्वराज्य पक्षाच्या वतीने शेतकरी हेल्पलाईन सुरू केली होती. या हेल्पलाईनवर राज्याच्या विविध भागातील अनेक शेतकऱ्यांनी खते, बी बियाणे, युरिया चढ्या दराने विक्री केली जात असल्याची तक्रार केल्या. त्याप्रमाणे पक्षाचे सरचिटणीस डॉ. धनंजय जाधव व त्यांच्या काही सहकाऱ्यांनी पुणे शहरात मार्केट यार्ड परिसरातील पान २ वर

# मुंबईतील २१ एकरचा भूखंड अदानींना गिफ्ट !

## शासनाचा जिआर निघाला; काँग्रेसचा गंभीर आरोप



मुंबई । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे सरकार अदानींवर मेहरबान असून अदानींसाठीच सत्ता राबवली जात असल्याचे पुन्हा पुन्हा स्पष्ट होत आहे. धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या नावाखाली सरकारने सर्व नियम, कायदे, अटी ह्या अदानीचा फायदा पाहूनच बनवले आहेत. भाजपा सरकारने आता धारावी प्रकल्पासाठी कुर्ल्यातील मदर डेअरीची २१ एकर जागा अदानीच्या घशात घालण्याचे सरकारी फर्मान काढले आहे. कोणतीही टेंडर प्रक्रीया न राबवता कोट्यावधी रुपये किमतीची ही मोक्याची जागा नाममात्र दराने अदानीला बहाल केली असून, हा एक महाघोटाळा असल्याचा आरोप मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रीया देताना खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की, मोदानी अँड कंपनीला संपूर्ण मुंबई गिळायची आहे आणि त्यासाठी वाटेल त्या थराला जाण्याची भूमिका भाजपा सरकारने घेतलेली आहे. जी जमीन सरकारी आहे, ती जमीन अदानींची असा प्रकार सुरु आहे. भाजपा सरकारने अदानींसाठी पान २ वर

# सगेसोयरेच्या अंमलबजावणीसाठी सरकारला एक महिन्याचा अल्टीमेटम

## मनोज जरांगे पाटील यांची उपोषणाला एक महिन्यासाठी स्थगिती



जालना । प्रतिनिधी

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने गुरूवारी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत सगेसोयरे अध्यादेश अंमलबजावणी प्रश्नी मुदत मागत उपोषण स्थगित करण्याची विनंती केली. त्यानुसार मनोज जरांगे पाटील यांनी एक महिन्याकरीता उपोषणाचे आंदोलन स्थगित करीत सरकारला एक महिन्याचा अल्टीमेटम दिला आहे. राज्य सरकारकडून मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, मंत्री तथा खासदार संदीपान भुमरे आदी गेले होते.

मराठा आरक्षणप्रश्नी आणि सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करण्याच्या मुख मागणीसाठी पुन्हा एकदा राज्य सरकारच्या विरोधात मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण आंदोलनाचे हत्यार उपसले. परंतु मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती चवथ्या दिवसापासून ढासळायला सुरुवात झाली. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांना सलाईन लावण्यात आले. मात्र दोन दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारकडून करण्यात येत असलेल्या उपचाराला नकार दिला. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी या वर्षी एप्रिलमध्ये सूचित केल्यानुसार ८ जून रोजी आमरण उपोषण सुरू केले. यावेळीही मराठा आरक्षण न दिल्यास ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका लढविणार असल्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी करत राज्य सरकारला इशारा दिला.

मराठा आरक्षणाबाबत सत्ताधारी भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुती आघाडी आणि विरोधी महाविकास आघाडी या दोघांवरही "काहीच करत नाही" अशी टीका जरांगे पाटील यांनी केली होती. राज्य सरकारवर टीका पान २ वर

### गेवराईत तरुणाचा संशयास्पद मृत्यू

**गेवराई: शहरातील हॉटेल मध्ये आचारी म्हणून काम करणाऱ्या एका तरुणाचा संशयस्पद मृत्यूदेह सापडल्यामुळे खळबळ उडाली आहे. गणेश नाथा आबदगिरे वय ३८ वर्ष रा. मुंगी ह्ल्ली मुक्काम यशराज नगर, गेवराई असे मयताचे नाव आहे.**

शहरातील एका नामंकीत हॉटेलवर आचारी म्हणून तो काम करत होता. दि. १२ रोजी रात्री शहराबाहेरील मांगिरबाबा स्मशान भूमीजवळ मयताची मोटारसायकल आढळली होती. तिथूल पुढे एक किलोमिटर अंतरावर दि. १३ रोजी सकाळी तरुणाचा मृतदेह आढळला आहे. टीएमसी परिसरातील गायरानात मृत अवस्थेत पडलेला पान २ वर

## नीट परीक्षा पुन्हा घेण्यासाठी जंतर मंतरवर सत्याग्रह आंदोलन

नवी दिल्ली । वृतसंस्था

नीट परीक्षेमध्ये झालेल्या गोंधळ परिस्थितीच्या विरोधात गुरूवारी (दि.१३) विद्यार्थी, पालक आणि वेगवेगळ्या विद्यार्थी संघटनांनी दिल्लीतील जंतर मंतरवर 'नीट सत्याग्रह आंदोलन' सुरू केले आहे. न्यायालयाने ग्रेस मार्क रद्द केल्यानंतर ही परिक्षाच रद्द करून नव्याने परिक्षा घेण्याची मागणी आंदोलनकर्त्यांची आहे.




राष्ट्रीय चाचणी संस्थेची (एनटीए) सीबीआय चौकशी करावी. तसेच संपूर्ण नीट परीक्षा पुन्हा घेण्यात यावी, अशी आंदोलकांची मागणी आहे. नीट परीक्षेचा पान २ वर

# महायुतीच्या नेत्यांच्या गैरहजेरीत सुनेत्रा पवार यांचा राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज

## सकाळी निर्णय लगेच दुपारी अर्ज दाखल

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडूण जाणाऱ्या एका जागेकरीता अजित पवार यांच्या पत्नी तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी गुरूवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. विशेष म्हणजे महायुतीच्या उमेदवार म्हणून सुनेत्रा पवार यांच्याकडे पाहिले जात असताना मात्र महायुतीचे तथा भाजपा नेते देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांपैकी एकही नेता यावेळी उपस्थित नव्हता.


राज्यसभा खासदार असलेल्या प्रफुल पटेल यांनी त्यांच्या पदाची आणखी



साडेचार वर्षे शिल्लक असताना यापूर्वी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर प्रफुल पटेल यांनी पुन्हा राज्यसभेसाठी अर्ज दाखल करत महायुतीचे उमेदवार म्हणून राज्यसभेवर निवडूण आले. त्यामुळे पटेल यांच्या पान २ वर

### पंतप्रधान मोदींनी घेतला जम्मू – काश्मीरच्या सुरक्षा स्थितीचा आढावा

नवी दिल्ली। वृतसंस्था



**दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी उपलब्ध संसाधने आणि धोरणांचा पूर्ण क्षमतेने वापर करा, असे निर्देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू आणि काश्मीरच्या सुरक्षा आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना दिले. कुठल्याही आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज राहण्याचेही आदेश त्यांनी यावेळी दिले आहेत.**

जम्म–काश्मीरमध्ये गेल्या काही दिवसांपासून दहशतवादी हल्ले वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर ह्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या आढावा बैठकीसाठी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी पान २ वर

## अजित डोभाल सलग तिसऱ्यांदा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी

नवी दिल्ली । वृतसंस्था

**अजित डोभाल यांची सलग तिसऱ्यांदा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पद नियुक्ती करण्यात आली आहे. तर पीके मिश्रा हे पंतप्रधान मोदींचे प्रधान सचिव म्हणून कायम राहणार आहेत.**

मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने डॉ. पी.के. यांच्या नियुक्तीला मान्यता दिली आहे. त्यामुळे सेवानिवृत्त अधिकारी डॉ. पी. के. मिश्रा हे सोमवार १० जून २०२४ पासून पंतप्रधानांचे प्रधान सचिव म्हणून कार्यरत आहेत. त्यांची नियुक्ती पंतप्रधानांच्या कार्यकाळासह किंवा पुढील आदेश येईपर्यंत यापैकी जे आधी असेल ते सह–टर्मिनस असेल. त्यांच्या पदाच्या कार्यकाळात, पान २ वर



### श्री संत गजानन महाराज पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

बुलढाणा । प्रतिनिधी



आषाढी एकादशीच्या पर्वावर विठू माऊलीचे दर्शन घेण्यासाठी संत गजानन महाराजांच्या पालखीचे सातशे पायदळ वारकऱ्यांसह पंढरपूरकडे प्रस्थान झाले. पालखी सोहळ्याचे हे ५५ वे वर्ष आहे. गुरूवारी (दि.१३) सकाळी ७ वाजता मंदिर प्रांगणात संस्थानच्या विश्वस्तांनी श्रींच्या रजत मुखवट्याचे विधीवत पूजन केले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनीही श्रींचे दर्शन घेतले. मंदिराच्या प्रांगणातून ७०० वारकऱ्यांसह व हजारो भाविकांच्या उपस्थितीत राजवैभवी थाटात पालखीने पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३५.५० क्विंटल | २,१६० | २,३७१ | २,२९३ |
| ज्वारी/हायब्रिड : १२८.५० क्विंटल | १,६७६ | २,८८१ | २,३१६ |
| मूग : ०.५० क्विंटल | ७,२३० | ७,२३० | ७,२३० |
| तूर : ८.५० क्विंटल | ९,७०० | ११,४५१ | १०,९७५ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: १७.५० क्विंटल | २,४६१ | २,६९० | २,५७६ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ११४.०० क्विंटल | ४,४११ | ४,४३१ | ४,४२३ |
| हरभरा: २७.०० क्विंटल | ६,४०० | ६,५५० | ६,४७५ |

# एसटी महामंडळातील बदल्या पारदर्शक होणार..!

## महामंडळातील सर्व विनंती बदल्या आता संगणकीय ॲपव्दारे; व्यवस्थापकीय संचालक डॉ. कुसेकर यांचा विशेष पुढाकार

मुंबई । प्रतिनिधी

**एसटी महामंडळामध्ये काम करणाऱ्या चालक–वाहकापासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या विनंती बदल्या यापुढे संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. यामुळे बदल्यांबाबतचे विविध आक्षेप कमी होणार असून, सेवा जेष्ठतेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना समान न्यायाची हमी या नव्या पध्दतीने शक्य होणार आहे.**

एसटी महामंडळामध्ये चालक–वाहकापासून अधिकाऱ्यांपर्यंत सुमारे ८७ हजार कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. एक मध्यवर्ती कार्यालय, सहा प्रदेश, त्या प्रदेशांतर्गत ३१ विभाग आणि या विभागांतर्गत कार्यरत असलेले २५१ आगार. या बरोबरच तीन मध्यवर्ती कार्यशाळा, ९ टायर पुनस्त:रण प्रकल्प आणि एक मध्यवर्ती



प्रशिक्षण संस्था असा एसटी महामंडळाचा अवाढव्य पसारा आहे. या सर्व आस्थापनांमध्ये काम करणारे कर्मचारी गंभीर आजारपण, पती–पत्नी एकत्रीकरण, आपापसातील बदली अशा अनेक कारणास्तव विनंती बदलीचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांकडे सादर करतात. परंतु विविध प्रकारच्या हस्तक्षेपामुळे, बदल्यांमध्ये अनियमितत होत असते. परिणामी, कर्मचाऱ्यांना योग्य प्रकारे न्याय मिळत नाही. अनेक कर्मचाऱ्यांचे विनंती बदली अर्ज वर्षानुवर्ष धुळखात पडलेले असतात. याला आळा घालण्यासाठी आणि सेवा जेष्ठतेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय मिळण्याच्या हेतूने महामंडळाचे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या विशेष पुढाकाराने बदल्या संदर्भातील संगणकीय प्रणालीव्दारे ॲप एसटी महामंडळाकडून विकसित करण्यात येत आहे.

या ॲपव्दारे विभागांतर्गत एका आगारातून दुसऱ्या आगारात, प्रदेशांतर्गत एका विभागातून दुसऱ्या विभागात आणि राज्यात एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात विनंती बदलीचे (एकाच पदात १ वर्ष पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे) अर्ज भरून घेण्यात आले आहेत. संबंधित कर्मचाऱ्याला विनंती बदलीमध्ये तीन पर्याय देण्याची मुभा देण्यात आलेली आहे. बदली प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी भविष्यात संगणकीय ॲप पध्दतीचा मोठा फायदा होणार असून विविध जात प्रवर्ग, बिंदु नामावली विचारात घेवून रिक्त पदाच्या ठिकाणी सेवा जेष्ठतेनुसार बदल्या करण्याची संगणकीय पध्दत महामंडळाने स्विकारली आहे. सबब, कर्मचाऱ्यांना समान पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# अहंकारी प्रवृत्तीला कानपिचक्या

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही वेगळी आघाडी आहे. भाजपा मोठा पक्ष झाला आहे. संघाची आम्हाला गरज लागत नाही, असे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी निवडणुकी दरम्यान इंग्रजी वृत्तपत्राला मुलाखत देताना म्हटले होते. तेव्हाच भाजप नेतृत्व आणि रा. स्व.संघ यांच्यात काही धुमसते आहे हे लक्षात आले होते. सोमवारी नागपुरात संघ शिक्षा वर्गाच्या समारोपात सरसंघचालकांनी नड्डा अथवा मोदी कुणाचेही नाव न घेता ज्या कानपिचक्या दिल्या आहेत, त्या पाहता भाजपची संख्या स्वबळावर बहुमत का करू शकली नाही हे सर्वांच्या लक्षात आले असेल. भागवतांनी आक्रमक पद्धतीने मोदी, शहा, नड्डा यांना डोस दिला आहे. यातून पुढे काय होणार हे बघावे लागेल.

संघाचा भाजपासाठी हा पहिला धडा नाही. फिल गुडच्यावेळी भाजपा हिंदुत्ववादी अजेंडा राबवत नाही म्हणून संघाचा रोष होता. तेव्हा पराभव झाला. मोदींनी संघाचा ३७० कलम रद्द, तीन तलाक, समान नागरी कायदा, राममंदिर असा कार्यक्रम राबवला. पण, अलीकडे ते संघ व संघ पदाधिकारी यांच्याशी नीट संबंध राखून नव्हते. राम मंदिर प्रतिष्ठापना समारोपापूर्वी मोदी व मोहन भागवत यांची भेट व चर्चा व्हावी असे नियोजन होते. पण, मोदींनी नकार दिला. मोदी नागपुरात मुक्कामाला राहिले पण, संघ मुख्यालयाकडे किंवा हेडगेवार समाधीस्थळाकडे फिरकले नाहीत याचा रागही संघाला, सरसंघचालकांना होता. संघ दसरा उत्सवात गेली काही वर्षे भाजपा सरकारचे कौतुक करत असे. पण, पंतप्रधान मोदींना अहंकाराची बाधा झाली आहे ते आणि शहा कुणालाही जुमानत नाहीत. भाजपाने महाराष्ट्रात राजकारणाचा चिखल केला. प्रचारात पातळी सोडली, या सगळ्याचा संताप म्हणजे नागपुरातील मोहन भागवतांचे भाषण होते. खरेतर संघ दसरा मेळावा सोडला तर अधेमधे जाहीरपणे असे कोणते वक्तव्य करत नाही. पण, प्रथा बाजूला ठेवून सरसंघचालकांनी शेलक्या शब्दात मोदी, शहा व नड्डा यांना नाव न घेता नेमके औषध दिले आहे. सरसंघचालकांनी खडे बोल मतदान, मतमोजणी व शपथविधीनंतर सुनावले असले तरी त्यांच्याही मनात बराचकाळ ही तळमळ असावी. खरे तर भाजपा ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची राजकीय आघाडी, संघाने शामाप्रसाद मुखर्जी जेव्हा जनसंघ काढतो म्हणाले तेव्हा त्यांना शक्ती दिली. दीनदयाळ उपाध्याय, जगन्नाथराव जोशी, लालकृष्ण अडवाणी, वसंतराव भागवत असे नेते पुरवले. तथापि संघाने भाजपचे अस्तित्व स्वतंत्र ठेवले. भाजपच्या निर्णयात ढवळाढवळ केली नाही. पण, आपली राजकीय आघाडी स्वत:ला स्वतंत्र शक्तिमान समजून संघाची गरज उरली नाही, अशी मुक्ताफळे उधळायला लागली आणि संघटनेपेक्षा, व्यक्तीमहात्म्य वाढू लागले. तेव्हा संघटन में शक्ती है, याची संबंधितांना प्रचिती देणे गरजेचे होते आणि सरसंघचालक मोहन भागवत यांनी ती दिली. भाजपची सत्ता असणे हे संघाला अपेक्षीत आहे. भाजपा सरकारने संघाचे वर्षानुवर्षे प्रलंबित ३७० वे कलम रद्द, राममंदिर असे विषय सोडवले. याचा संघाला आनंद व अभिमान आहे पण, भाजपात कुणा प्रमुखाला अहंकाराचा वारा लागला तर ते संघाला मान्य होणार नाही. म्हणूनच भागवतांनी नागपुरात भाष्य करताना अहंकारी व्यक्ती सेवाभाव किंवा सेवक होऊ शकत नाही असे वर्मावर बोट ठेवले. मोदी स्वत:ला प्रधानमंत्री नव्हे तर आपण प्रधानसेवक आहोत असे सांगतात. त्यांचा हा संदर्भ होता. निवडणुका होतात, सत्ता येते जाते. निवडणुकीत एक सत्ताधारी होतो व दुसरा प्रतिपक्ष. लोकशाहीत प्रतिपक्ष म्हणजे शत्रू नव्हे देश व संसद ही चर्चेने सहमतीने चालवली पाहिजे, असेही भागवत यांनी म्हटले आणि निवडणूक काळात प्रचाराची भाषा, टीका यांची पातळी राखली जात नाही याचा संतापही बोलून दाखवला. राजकीय पक्षात शत्रुत्वाची भावना निर्माण होता कामा नये, अशी त्यामागची भूमिका आहे. संघाला शिवसेनेबरोबर महाराष्ट्रात झालेला व्यवहारही आवडला नसावा. इतर राज्यात तुम्ही समाजवादी व भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्यांना बरोबर घेता, त्यांना मुख्यमंत्री होण्यासाठी समर्थन करता मग हिंदुत्ववादी शिवसेनेने महाराष्ट्रात ठरले नसतानाही अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद मागितले तर द्यायला काय हरकत होती असाही सूर संघ परिवारातून ऐकू येत होता. भागवतांच्या भाषणाला तो संदर्भही शक्य आहे. संघ मणिपूरमधील घटनांनीही व्यथित आहे. मणिपूरचा विषय तातडीने सोडवायला हवा होता. तो गंभीरपणे घेतला नाही असेही संघाचे म्हणणे आहे. भाजपात कुणालाही प्रवेश दिले जात होते. सरकारी यंत्रणांचाही कसाही वापर होत होता. आप सारख्या पक्षाचे नेते जेलमध्ये घातले हे काहीजणांना आवडले नव्हते. ओघानेच सारे साचलेले बाहेर आले व नाव न घेता मोदी व शहा, ना वगैरेंना योग्य त्या कानपिचक्या दिल्या आहेत.

---

## रामकृष्ण परमहंस परिवार व रोटरी क्लब आफ केज यांच्या संयुक्त विद्यमाने केज शहरात रक्तदान शिबीर

**केज । प्रतिनिधी**

अंबेजोगाई येथील शासकीय रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा झालेला असल्याने तेथील रक्त पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी ब्लड बँकेच्या विनंतीवरून रामकृष्ण परमहंस परिवार केज, रोटरी क्लब आफ केज, संस्कार प्रतिष्ठान केज यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक १३ जून २०२४ रोजी हनुमानमंदिर वकिलवाडी केज येथे सकाळी १०-३० वाजता तातडीचे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. आंबेजोगाईच्या ब्लड बँकेवर केज तालुक्यातील रुग्ण अवलंबून आहेत. एरवी दिनविशेष व महापुरुष आणि राजकीय नेते व इतर लोकांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात.अशा वेळी सामाजिक निष्ठेपेक्षा व्यक्ती निष्ठा किंवा भावना बाळगून मोठया प्रमाणात रक्तदान केले जाते. याउलट जेंव्हा रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा भासतो तेंव्हा कोणीच पुढे येत नाही.रोटरी क्लब ऑफ केज,रामकृष्ण परमहंस परिवार व संस्कारप्रतिष्ठान केज यांनी यापुढे जेंव्हा रक्ताचा तुटवडा भासेल अशा



वेळीच इमर्जन्सी रक्तदान शिबिर आयोजित करण्याचा निर्धार केला आहे.सध्या अंबेजोगाई येथील शासकीय रक्तपेढी त रक्ताची कमतरताभासत असल्याने रक्तपेढीच्या विनंतीवरून केज येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.केवळ एका सोशल मीडियाच्या मेसेज वरून दीड तासात शहरातील १६ समाजप्रेमी रक्तदात्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले.

यामध्ये सोमनाथ किशोर शेटे, प्रथमेश महेंद्र शेटे,गीता जीवराज अंडील,नरेश हनुमंत बोर्डे,विवेक विक्रम राव देशमुख,उदय बबनराव कुंभकर्ण, शिवाजी अशोक औसेकर, प्रतीकराजे हनुमंतभोसले, अनिकेत अनंतराव देशमुख,शेख लियाकत उस्मान,शुभम सचिन अंधारे,भाग्यश्री प्रवीण पैठणकर (आई),मृण्मयी प्रवीण पैठणकर (मुलगी), प्रकाश सदाशिव उंबरकर, गौतम सुरेश मोरे,संतोष रामभाऊ लोंढे या रक्त दात्यांचा समावेश आहे. यावेळी महिला रक्तदात्यां चा विशेष उत्साह होता. गीता जीवराज अंडील यांनी इतरांना प्रेरित करत रक्तदान केले तर भाग्यश्री प्रवीण पैठणकर,मृण्मयी प्रवीण पैठणकर या माय लेकींनी उस्फूर्तपणे रक्तदान केले.वरील सर्व रक्तदात्यांचे ज्यांना यांचे रक्त दिले जाणार आहे अशा सर्व गरजू रुग्णांच्या वतीने व केजवासीयांच्या वतीने प्रोजेक्ट चेअरमन हनुमंत भोसले यांनी आभार व्यक्त केले.हे शिबीर यशस्वी करण्या साठी केज रोटरीचे पुढील वर्षाचे अध्यक्ष प्रकाश कामाजी,सचिव अनंत तरकसबंद, प्रवीणदेशपांडे, अरुण अंजान,दादाजमाले तर रामकृष्ण परमहंस परिवाराचे शिवाजी औसेकर,उदय कुंभकर्ण, सुर्यकांत लोंढे सर यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

## मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची तात्काळ शासनाने दखल घ्यावी

### राज्यपालांना बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचे पत्र

**केज । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची शासनाने तात्काळ दखल घेण्यात यावी याआशयाचे पत्र बीडचे नवनिर्वाचीत खासदार बजरंग सोनवणे यांनी महामहीम राज्यपाल यांना दिले आहे. आंतरवाली सराटी येथे मागील पाच दिवसापासून मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण चालू आहे. आज रोजी त्यांच्या उपोषणाला पाच दिवसाचा कालावधी उलटून गेला



आहे.मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावत चाललेली आहे त्या अनुषंगाने बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे यांनी महामहीम राज्यपालांना पत्र पाठवले आहे सदरील पत्रामध्ये असे म्हटले आहे कि,आपणास नम्र निवेदन करण्यात येते की,श्री. मनोज जरांगे पाटील हे दिनांक ८ जून २०२४ पासून आंतरवाली-सराटी जि.जालना येथे मराठा समाजाला आरक्षण सगेसोयरे यांना मिळावे याकरिता आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांनी गेल्या पाच दिवसा पासून अन्न,पाणी याचा त्याग केलेला आहे. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे. श्री.मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या विषयी महाराष्ट्र राज्य शासनाची भूमिका उदासिनतेची दिसून येत आहे.याबाबत महाराष्ट्र शासनाने वेळीच दखल न घेतल्यास महाराष्ट्र राज्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तरी या प्रकरणी आपण स्वत: लक्ष घालुन श्री.मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घेण्या साठी महाराष्ट्र शासनाला सूचित करावे याआशयाचे पत्र मा.राज्यपाल यांना पाठवले आहे.

---



## पोलीस प्रशासनाच्या वतीने सद्भावना रॅली

**बीड। प्रतिनिधी**

बीड पोलीस प्रशासनाच्या वतीने जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी बीड शहरात पायी सद्भावना रॅली पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली १३ जून २०२४ सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली . यावेळी सामाजिक कार्यकर्त्या एड. संगीता धसे , जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे, अशोक येडे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे आदी विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांसह पोलीस कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

---

## सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोष्ट टाकल्यास पोलिस कारवाई होणार

### शांतता कमेटी बैठकीत पोलिसांच्या वतीने सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन

**केज । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुक मतदान होऊन त्याचा निकाल दि.४ जुन रोजी निकाल घोषीत झाल्या नंतर बीड जिल्हयात काही समाज कंठक सोशल मिडीयावर काही विशिष्ठ समाजाविषयी आरोपी प्रत्यारोप व उमेदवार यांच्या विषयी आक्षेपार्ह पोस्ट लिहुन प्रसारीत करुन बीड जिल्हयात शांतताभंग करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्ननिर्माण करण्याचा प्रयत्न काही जण करत आहेत.बीड जिल्हा पोलीस दल हे सर्व प्रकारचे सोशल मिडीया च्या हालचालींवर बारकाई ने लक्ष ठेवुन आहे.असे आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या व्यक्तीवर तात्काळ गुन्हे दाखल करुन कारवाई करणे सुरु आहे.तसेच सदरच्या पोस्टला लाईक करणारे,त्यास सहमती दर्शवणारे किंवा सदरच्या पोस्ट व्हायरल



करणाऱ्या व्यक्तींवर देखील प्रतिबंधक कार्यवाही करत आहोत.बीड जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे वेळोवेळी पोलीस ठाणे स्तरावर व गाव पातळीवर शांतता कमेटीच्या बैठकी घेऊन बीड जिल्हयाची शांतता भंग करु नये व जातीय सलोखा राखण्या बाबत वारंवार सर्व जाती जमातीचे लोकांना आवाहन करण्यात आले आहे.दि.१२ जुन २०२४ रोजी पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे केज यांनी पोलीस ठाणे केज येथे सर्व जाती धर्माचे प्रतिष्ठीत नागरीकांची तसेच राजकीय व्यक्तीची शांतता समितीची बैठक घेऊन त्यांना शांतते बाबत आवाहन केलेले आहे. त्यामुळे कोणत्याहीविशिष्ठ जातीच्या किंवा धर्माच्या प्रमुख राजकीय, सामाजीक व्यक्तीं विरूध्द कोणत्याही प्रकारे आक्षेपार्ह लेखन करुन लोकांच्या भावना दुखावणार नाहीत याची दक्षता घ्यावी.सदरील पोष्ट बाबत मा.जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय बीड, सायबर पोलीस ठाणे बीड यांच्याकडुन अशा लोकां वर बीड जिल्हा पोलीस दल बारकाईने लक्ष ठेवुन असुन अशा समाज कंटकाविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल याबाबत सोशल मिडीया वर प्रसिध्दी देण्यात आलेली आहे.तसेच अशा लोकांवर यापुर्वी कार्यवाही देखील करण्यात आलेली आहे.तरी यापुढे कोणीही सोशल मिडीयावर (व्हॉटसअप,फेसबुक, इन्स्टाग्राम,स्नॅपचॅट) इत्यादी सोशल मिडीयावर कोणीही आक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत करणार नाही याची दक्षता घ्यावी.तसेच कोणतेही धरणे आंदोलन, उपोषण,साखळीउपोषण, रस्तारोको व गाव शहर बंद करणार नाहीत.ज्या मुळे शासकीय नोकरदार, शालेय विद्यार्थी व शेतकरी यांना अडचण होईल असे कोणतेही कृत्य करणार नाहीत याची दक्षताघ्यावी. असे आवाहन बीड जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात येत आहे.

---

## राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा

**सोलापूर । प्रतिनिधी**

राज्यात कामगार मंत्री सुरेश खाडे यांचे कामगार विभागावर नियंत्रण नसल्यामुळे कामगारांच्या कल्याणकारी योजना व त्यांचे विकास आणि संरक्षण होत नाही. कामगार विभाग मंत्रालय मुंबई, राज्याचे कामगार आयुक्त कार्यालय आणि इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई आणि सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर कार्यालयात अधिकारी, कर्मचारी वेळेवर येत नाही. मनमानी लहरी पध्दतीने कामकाज चालू आहे.

त्यामुळे शासनाने कामगारांसाठी लागू केलेले कल्याणकारी योजना व कायद्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे शासनाचे मुळ उद्देश सफल होत नसल्याने कामगार मंत्री सुरेश खाडे यांची मंत्री मंडळातून हकालपट्टी करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी कामगार संघटना महासंघाचे अध्यक्ष साथी बशीर अहमद यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पुनम गेट येथे निदर्शने करत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना उपजिल्हाधिकारी (महसूल) अमृत नाटेकर यांच्यामार्फत समक्ष भेटून निवेदन सादर करण्यात आले. यावेळेस कामगार संघटना महासंघाचे अध्यक्ष साथी बशीर अहमद, शिवसेना कामगार आघाडी (शिंदे गट) चे अध्यक्ष सायबण्णा तेगेळ्ळी, समता मजदूर युनियनचे अध्यक्ष साथी छगन पंढरे, संघर्ष कामगार संघटनेचे अंगद जाधव, राष्ट्रीय मुननिवासी बहुजन कर्मचारी संघाचे सिध्दार्थ बोराडे, मिलिंद गायकवाड, औद्योगिक कामगार सुरक्षा युनियनचे अशोक कांबळे, लेबर पार्टीचे जिल्हाध्यक्षा सत्यव्वा गायकवाड, रफिक तांबोळी जनरल कामगार युनियनचे कॉ. एजाज शेख, बाबा बागवान, महाराष्ट्र राज्य लेबर युनियनचे महेबूब शेख, अशपाक शेख, रंगनी कामगार युनियनचे कॉ. शंकर तुम्मा, लेबर पार्टीचे कॉ. चंद्रकांत बदलापूरे, मुज्जो पठाण, भिमशक्ती शिवशक्ती कामगार संघटनेचे साथी नितीन कांबळे, शिवाजी कांबळे, सुगतपाल कांबळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## पान १वरून...

### २६६ रुपयांची खताची

असणाऱ्या खत विक्री दुकानात शहानिशा केली. येथे २६६ रूपयांची खताची गोणी तब्बल ८०० विकली जात असल्याचे उघड झाले आहे. एमआरपीपेक्षा जवळपास तिप्पट दराने खतांची विक्री केली जात आहे. याबाबत गेल्या महिन्यातच पक्षाच्या वतीने राज्याच्या कृषी आयुक्तांना निवेदन देण्यात आले असून जून्या दराने खतांची पूर्तता करा, अशी मागणी केली आहे. तसेच बोगस खते व बियाणे याबाबत तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आल्याचे संभाजीराजे म्हणाले. दोन दिवसांत कृषी आयुक्तांची बदली करण्यात आली. आता राज्याला कृषी आयुक्त नाहीत. ही अतिशय धक्कादायक बाब असून शेतकऱ्यांची लूट, फसवणूक करणाऱ्यांवर राज्य सरकारने तातडीने कार्यवाही करावी असे संभाजीराजे म्हणाले. तसेच मागील वर्षीच्या दुष्काळातील विमा अग्रीम आणि विम्याची रक्कम अद्यापही अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांना मिळालेली नाही. ती देखील मिळावी अशी मागणी संभाजीराजे यांनी केली आहे.

-----------

### सगेसोयरेच्या अंमलबजावणीसाठी

करताना मनोज जरांगे पाटील म्हणाले होते की, राज्य सरकारने आमची दिशाभूल केली आहे. महायुतीने आम्हाला मराठा आरक्षण दिलेले नाही. महाविकास आघाडीची सत्ता असताना त्यांनी मराठा आरक्षणासाठी काहीही केले नाही. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा समाज गेल्या अनेक वर्षांपासून राज्य सरकारविरोधात आंदोलन करत आहे. या वर्षी फेब्रुवारीमध्ये, महाराष्ट्र सरकारने, विशेष विधानसभेच्या अधिवेशनात, महाराष्ट्र मागासवर्ग आयोगाने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे मराठ्यांना १० टक्के आरक्षण वाढवण्याचे विधेयक मंजूर केले. मात्र, पाटील यांनी आरक्षणाला विरोध करत मराठ्यांना ओबीसी प्रवर्गात कोट्याचा आग्रह धरला.

--------

### मुंबईतील २१ एकरचा

धारावी टेंडर आणि टीडीआर महाघोटाळा केला आणि धारावीकरांचा हक्क मारण्याचा कट रचला. नंतर धारावी पुनर्वसनाच्या नावाने पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असणाऱ्या मिठागरांच्या जमिनी व पूर्वी जकात नाक्यासाठी असलेली मुलुंड येथील महापालिकेची जागा आणि डम्पिंग ग्राउंडची जागा लुबाडण्याचा डाव मांडला. आता पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असणारी कुर्ला येथील मदर डेअरीची जागा यांना गिळून टाकायची आहे. कोणालाही विश्वासात न घेता, कुठलीही जनसुनावणी न करता हा हिरवळीचा भूखंड अदानींच्या घशात घातला जात आहे. परंतु धारावी पुनर्वसनाच्या नावाखाली अदानीला नाममात्र दराने हा भूखंड भेट देण्याचा डाव हाणून पाडू, असा इशारा वर्षा गायकवाड यांनी दिला आहे.

**भूखंड देण्याचा शासन आदेश निघाला**

मदर डेअरीने पूर्वी वापरलेल्या कुर्ला येथील भूखंडावर ८०० ते ९०० मौल्यवान झाडे आहेत, ज्यांच्यामुळे इथला परिसर हा पर्यावरणपूरक आणि संवेदनशील आहे. पण या झाडांची निर्दयीपणे कत्तल करून या इको-सेन्सिटिव्ह भूखंडच्या मुद्रीकरणाचे मनसुबे महाभ्रष्टयुती सरकारचे आहेत. यापूर्वी भाजपच्याच एका उच्चपदस्थ नेत्याचा डोळा या भूखंडावर पडला होता आणि या जागी औद्योगिक संकुल उभारण्याचा खेळ मांडला होता. त्यासाठी काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एमएमआरडीएची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली होती. पण आता पंतप्रधान नरेंद्र मोदींचे परम मित्र अदानींची नजर या भूखंडावर पडली आहे. एकनाथ शिंदेंच्या पूर्वीच्या आदेशांना केराची टोपली दाखवत महसूल व दुग्धविकास विभागाने ही जागा अदानीच्या ग्रूपला भेट देण्याचा शासनादेश काढला आहे. काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट असून एकाही धारावीकराला विस्थापित होऊ देणार नाही, प्रत्येक धारावीकराचे पुनवर्सन धारावीतच झाले पाहिजे. पात्र-अपात्र आम्ही मानत नाही अशी आमची भूमिका असल्याचे वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे.

------------

### महायुतीच्या नेत्यांच्या गैरहजेरीत सुनेत्रा

राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेकरीता सध्या ही निवडणूक पार पडत आहे. सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्याचा निर्णय गुरूवारी सकाळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानंतर लगेच दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, विधानसभेचे उपसभापती नरहरी झिरवळ, छगन भुजबळ आदी नेत्यांच्या उपस्थितीत सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**छगन भूजबळ नाराज**

दरम्यान, या रिक्त जागेसाठी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ हे इच्छुक होते. तसेच नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीसाठी नाशिकमधून लोकसभआ निवडणूक लढविण्यासाठी छगन भुजबळ हे इच्छुक होते. मात्र छगन भुजबळ यांना अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी नाकारली. त्यामुळे छगन भुजबळ हे नाराज असल्याचे बोलले जात आहे.

**महायुतीचे नेते जाणीवपूर्वीक गैरहजर**

तर दुसऱ्याबाजूला राज्यातील महायुतीचे नेते अजित पवार यांच्या पत्नी तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यावेळी उपस्थित नव्हते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत अजित पवार यांना बारामती लोकसभा मतदारसंघातून त्याच्या पत्नीला उमेदवारी दिली खरी. मात्र त्या जागेवर मिळवता आला नाही. त्यामुळे केंद्रातील भाजपा श्रेष्ठी भलतेच नाराज झाल्याचे बोलले जात आहेत. त्यामुळे भाजपाला फायदा न होणाऱ्यांना दूर लोटा असे स्पष्ट शब्दात राज्यातील नेत्यांना सांगण्यात आले. त्यामुळे महायुतीचे नेते सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यावेळी जाणीवपूर्वीक गैरहजर राहिल्याचे बोलले जात आहे.

-------------

### नीट परीक्षा पुन्हा घेण्यासाठी

पेपर फुटला होता, परीक्षेतील गैरप्रकाराबाबत पटना आणि गुजरातमध्ये दहा ते पंधरा जणांना अटक करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. यावर्षी असंख्य विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्यात आले आहेत. त्यामुळे इतर अनेक विद्यार्थ्यांवर अन्याय झाले आहेत. पारदर्शक पद्धतीने परीक्षा घेण्यात एनटीए संस्था अपयशी ठरली. दरम्यान शिक्षणमंत्री या संस्थेला क्लीन चीट देत असल्याबद्दल विद्यार्थी व पालकांनी संताप व्यक्त केला आहे.

----------

### गेवराईत तरुणाचा

मृत्यूदेह सापडला असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी पंचनामा करीत पुढील कारवाई केली. सदर तरुणाचा संशयास्पद मृतदेह आढळल्यामुळे यामध्ये घातपात असण्याची शक्यता आहे. याबाबत गेवराई पोलिस अधिक तपास करीत आहेत.

------------

### पंतप्रधान मोदींनी घेतला जम्मू –

उपस्थित होते. सदर बैठकीत दहशतवादाविरोधात लढण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमेची माहिती पंतप्रधानांना देण्यात आली. तसेच जम्मू काश्मीरच्या सुरक्षिततेसाठी राबविल्या जाणाऱ्या धोरणांबद्दलही अधिकाऱ्यांनी मोदी यांना अवगत केले. बैठकीदरम्यान मोदींनी दहशतवादविरोधी क्षमतांचा संपूर्ण वापर करावा, कुठल्याही संभाव्य धोक्यांना तोंड देण्यासाठी तयार रहा, असे मोदींनी सरंक्षण अधिकाऱ्यांना सांगितले. सुरक्षा दलांची तैनाती आणि दहशतवादविरोधी कारवाया हाणून पाडण्याबाबत मोदी यांनी गृहमंत्री अमित शहा आणि जम्मू व काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्याशीही चर्चा केली आहे

---------

### श्री संत गजानन महाराज

श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान केले. यावेळी टाळ मृदंगाचा निनाद व हरिनामाच्या घोषाने संतनगरी दुमदुमून गेली. यानिमित्ताने शेगावात मोठ्या संख्येने आलेल्या भाविकांनी श्री क्षेत्र नागझरीपर्यंत पालखीसोबत चालून निरोप दिला. पालखी मार्गावर ठिकठिकाणी आकर्षक रांगोळी काढण्यात आल्या होत्या. तसेच विविध सेवाभावी संस्थांच्या वतीने,चहा,पाणी, मठ्ठा वितरित करण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

-----------

### अजित डोभाल सलग तिसऱ्यांदा

त्यांना प्राधान्यक्रमाच्या सारणीमध्ये कॅबिनेट मंत्री पद दिले जाईल, सांगण्यात आले आहे. सोमवार १० जून २०२४ पासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी किंवा पुढील आदेश येईपर्यंत, यापैकी जे आधी असेल तिथेपर्यंत माजी आयएएस अधिकारी अमित खरे आणि तरुण कपूर पंतप्रधान मोदींचे सल्लागार म्हणून काम पाहतील. ते भारत सरकारच्या सचिव पद श्रेणीत असणार आहेत.

-------------

### एसटी महामंडळातील बदल्या

न्याय देण्याबरोबरच महामंडळाच्या मनुष्यबळाचा क्षेत्रनिहाय समसमान वापर करण्यासाठी देखील हे ॲप उपयुक्त ठरणार आहे. लवकरच या संगणकीय ॲपव्दारे बदलीची प्रक्रीया सुरू करण्यात येणार आहेत.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.१४ जून २०२४



## मटा वृत्तवाहिनीच्या बातमीबाबतची वस्तुस्थिती

बीड महाराष्ट्र टाईम्स वृत्त वाहिनीवर दि. ७ जून २०२४ रोजी संध्याकाळी एक व्हिडीओ दाखवण्यात आला होता. बीड जिल्हयातील मोंढा येथे काही दुकानात युरिया खत शेतक-यांना मिळत नसल्याबाबत. कृषी मंत्री महोदय, व खासदार महोदय यांची नावे घेऊन व्हिडीओ क्लिप दाखविण्यात आली होती. त्या अनुषंगाने तालुकास्तरीय पथकामार्फत कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेषक यांच्या समवेत पडताळणी केली असता पुढीलप्रमाणे गोष्टी निदर्शनास आल्या आहेत. बातमीमध्ये श्रीदत्त ॲग्रो एजन्सीवर शेतकरी युरियाची मागणी करत असल्याचे दिसून येते. यामध्ये विक्रेता खत संपलेले आहे व उद्या येईल, आले की देतो असे सांगत आहे. तपासणी दरम्यान युरिया खत विक्री झाल्याने शिल्लक नसल्याचे दिसून आले. दुस-या दिवशी युरिया खत प्राप्त झाले व शेतक-यांना विक्री झाले. भिमसिंह ॲग्रो एजन्सीचा फोटो बातमीत दाखवला आहे. सदरील दुकानामध्ये युरिया खत उपलब्ध होते मात्र तेथे याबाबत विचारणा केली नाही. सदरील दुकानातील खत खरेदी करुन शेतकरी जात होते. माऊली एग्रो एजन्सी येथील गोडाऊनचा व्हिडीओ दाखवला आहे, सदरील गोडाऊनमधून शेतक-यांना खत विक्री चालू होती. ते गोडाऊन उघडेच होते. त्यामुळे या विक्री केंद्रामध्ये युरिया खत नाही त्या विक्री केंद्राचा व्हिडीओ प्रसार माध्यमात प्रसिध्द केला आहे. हे गैर आहे. व्हिडीओमध्ये शेतकरी युरिया खत व इतर खते खरेदी करा असे दुकानदार सांगत असल्याचे दाखवले आहे. वास्तविक पाहता केवळ युरियाचा वापर करणे हे जमिनीस, पर्यावरणास व एकंदरित सजीव सृष्टीस हानिकारक आहे.विद्यापिठाच्या शिफारशीनुसार नत्र, स्फुरद, पालाश याची मात्रा पिकास द्यावयाची असल्यास युरियाबरोबर इतर संयुक्त खते वापरणे आवश्यक आहे.युरियाबरोबर इतर खते वापरा असे प्रबोधन करणे गैर नाही.

# सोशल मीडियावर वाढदिवस साजरे करण्याचे प्रमाण वाढले

## माणसा-माणसातील सामाजिक अंतर वाढले; भेटीगाठी हरपल्या

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

सोशल मिडीयाचा वापर अनेक क्षेत्रामध्ये केला जात आहे. त्यामुळे कोसोदुर असलेले नातेवाईक, मित्र मंडळी, आवडती व्यक्ती एकदम जवळ आल्यासारखी वाटत असून सोशल मीडियाचा वापर राजकारण, समाजकारण, शैक्षणिक क्षेत्रात तसेच सर्वाधिक प्रमाणात वाढदिवस साजरा करण्यासाठी केला जात असताना दिसून येत आहे.यात मात्र माणसा-माणसातील सामाजिक अंतर वाढले असुन वाढदिवसानिमित्त प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा न देता सोशल मीडियावर शुभेच्छा देऊन मोकळे होणारे मात्र भेटी-गाठी विसरल्याचे वास्तव दिसून येत आहे.

या सोशल मीडियात व्हॉटस्? ॲप, फेसबुक,ट्विटर, टेलिग्राम, एसएमएस, एमएमएस यासारखी अनेक सोशल मीडियाद्वारे शहरी भागासह ग्रामीण भागातील वाडी,तांड्यावर वाढदिवस साजरे करण्याचे प्रमाणात वाढ झाली आहे. वाढदिवस साजरा करण्याची जणू काही स्पर्धाच लागल्याचे




दिसून येत आहे.सोशल मीडिया येण्याच्या अगोदर म्हणजे पुर्वीच्या काळी काही मोजक्याच क्षेत्रातील व्यक्तींचा तसेच सिनेक्षेत्रातील काम करणाऱ्या व्यक्तींचा प्रतिष्ठित व्यक्तींचा कुटुंबातील सदस्यांसह लहान मुलांचा वाढदिवस मोठ्या धुमधडक्यात साजरा केला जात होता. त्याची चर्चा सर्वत्र केली जात होती.ज्यांच्याकडे संपत्ती प्रतिष्ठा आहे, अशीच व्यक्ती मोठ्या थाटामाटात वाढदिवस साजरा करत होते.परंतु सोशल मीडियामुळे मात्र गरीब व्यक्तीपण आपल्या लहान मुलांचा वाढदिवस साजरा करताना दिसत आहे.सध्या सोशल मीडियामुळे दुरची व्यक्ती जवळ आल्यामुळे कोणीही वाढदिवस साजरे करण्यात मागे राहिलेले नाही. बॅनरचा धंदा मंदावला असून यामध्ये ग्रामीण भागातील वाडी, वस्ती व तांड्यावरील युवा पिढीतील युवक युवती वाढदिवस साजरा करण्यात मागे राहिलेले नाही. कधी काळी वाढदिवस साजरे करण्यासाठी डिजिटल बॅनरचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात होता.मात्र सोशल मीडिया आल्यापासून वाढदिवसाचे डिजिटल बॅनर लावण्याच्या प्रमाणात ही घट झाली आहे.त्यात फक्त पुढारी नेत्यांची बॅनर लावली जाते. आपआपला प्रिय जणांचा वाढदिवस दिनांक माहिती तंत्रज्ञानामुळे अपडेट राहत असल्याने कमी वेळात जास्तीत जास्त मित्र परिवाराला हा संदेश देता येतो.मग भाऊ-बहीण,नातेवाईक किंवा राजकीय पुढारी,पदाधिकारी,कार्यकर्त्यांचा वाढदिवस सोशल मीडियाच्या माध्यमातून साजरे होतात.

### माणसातील भेटीगाठी हरपल्या

सध्याच्या आधुनिक युगात सर्वच जण वावरत आहे.त्यामुळे आधुनिक युगाच्या हिशोबाने सोशल मीडिया देखील मोठ्या प्रमाणात वाटा देत आहे. याचा फायदा सर्वच घेत आहेत.या सोशल मीडियामुळे जवळची माणसे दुर जात आहे तर दुरची माणसे जवळ येत आहेत.सोशल मीडियाचा आधार घेवून वेगवेगळे प्रसंग जरी शेअर करीत असले तरी यात माणसातील भेटीगाठी हरपल्या आहेत.

### बॅनरचा धंदा मंदावला

आधुनिक काळात सोशल मीडियाचा वापर अधिक होत आहे.पूर्वी कोणत्या ना कोणत्या शुभ-अशुभ, वाढदिवस प्रसंगी शहरात बॅनर लागत होते.यामुळे आमचा धंदाही फार मोठा होत होता.आता धंदा मंदावला आहे. बॅनर लावण्याची क्रेज आता पूर्वीसारखा राहिलेली नाही.

-सत्यनारायण उनवणे डिझिटल बॅनर विक्रेता, माजलगाव

### मन बोटावर आले

आधुनिक युगात सर्वचजन मनाने हरवले आहेत.मात्र आधुनिक काळाचा वापर करत मन बोटावर आले असून आधुनिक काळात सण,उत्सवात नाते हरवले जात आहे. सर्व सण उत्सव आता एका बोटावर आले आहेत.

-आप्पासाहेब मुळे,शिक्षक

## युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त १०० रोपांचे वृक्षारोपण

**आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री योगेश्वरी देवीला महाआरती**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आज युवा सेना प्रमुख प्रमुख आदित्य साहेब ठाकरे यांचा वाढदिवस ल्याने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी २०२४ ला पर्यावरणाचा समतोल प्रचंड प्रमाणात बिघडलेला होता २०२४ साल महाराष्ट्राच्या जनतेचे उन्हामुळे प्रचंड हाल झाल्याकरणाने आम्ही युवा सेना प्रमुख आदित्य साहेब ठाकरे यांचा वाढदिवस हा खर्चाला फाटा देत वेगळ्या पद्धतीने करायचे ठरवले म्हणून अंबाजोगाई शहर व ग्रामीण भागात



योगेश्वरी देवी मंदिर परिसरात शिवसेना पक्ष वटवृक्ष सारखा वाढत असून म्हणून आम्ही वडाचे झाड निवडले अंबाजोगाई शहरात व ग्रामीण भागात शंभर झाडाचे वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा केला यावेळी बीड उपजिल्हाप्रमुख शिवाजी दादा कुलकर्णी. केज विधानसभेच्या महिला संघटिका डॉ नयनाताई सिरसाट तालुका प्रमुख बालासाहेब शेप प्रिन्स. शहर प्रमुख अशोक हेडे. युवा सेना तालुकाप्रमुख श्रीकांत कदम. शिवसेना उपजिल्हाप्रमुख अक्षय कदम. युवा सेना उपजिल्हाप्रमुख विष्णू धायगुडे. युवा सेना शहर प्रमुख निलेश जाधव. महिला आघाडी तालुकाप्रमुख रेखाताई घोबाळे. महिला आघाडी शहर प्रमुख सुनिता जाधव. महिला आघाडी शहर संघटिका जयश्रीताई मोरे. जोगदंड ताई.. शहर सचिव शंकर भिसे. तालुका सचिव बाबा भिसे. उप तालुका प्रमुख बालाजी चाटे. माजी तालुकाप्रमुख बाळासाहेब वाघाळकर. शहर संघटक पिंटू कदम. उपशहर प्रमुख पप्पू आपेट. विधानसभा सचिव रमेश सुडे. विधानसभा सचिव दूल्हेखा पठाण. शिवसैनिक भाऊसाहेब डबरे.

## भविष्यात गोरगरिबांच्या हातातली काठी म्हणून काम करण्याचा संकल्प -अजित गालफाडे

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील केंडेपिंप्री धानोरा या छोट्याश्या गावात राहून आपल्या समाजकार्याला सुरुवात करणाऱ्या वडवणी तालुका टायगर ग्रुपचे तालुकाध्यक्ष अजित गालफाडे यांनी आपला वाढदिवस विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवून साजरा केला.

टायगर ग्रुप राष्ट्रीय अध्यक्ष पै.डॉ. तानाजी भाऊ जाधव .मराठवाडा अध्यक्ष पै.गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर व मा. नगरसेवक दत्तात्रय (आप्पा) जमाले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. वडवणी तालुक्यात टायगर ग्रुप ला प्रत्येक गाव खेड्यात एक वेगळी ओळख निर्माण करून देण्यात अजित गालफाडे यांचा मोलाचा वाटा आहे. टायगर ग्रुप आणि अजित गालफाडे हे




जणू समीकरणच वडवणी तालुक्यात आपणास पाहावयास मिळत आहे त्यांनी आजपर्यंत आपले वाढदिवस हे गोरगरिबांच्या कल्याणासाठी उद्धारासाठीच समर्पित केलेले आहे आज त्यांनी आपला वाढदिवस हा वेगवेगळी कार्यक्रम राबवून साजरा करण्याचा संकल्प करून आपल्या कार्यकत्याना तसा सूचना संदेश देण्यात आला यावेळी त्यांनी पसायदान सेवा प्रकल्प ढेक्कनमोहा या ठिकाणी अन्नदानाचा कार्यक्रम केला , वडवणी पोलीस स्टेशन येथे महापुरुषांची प्रतिमा भेट दिली, वडवणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी रुग्णांना फळे वाटप केले , तालुक्यातील गाव खेड्यातील तांडा वस्तीवर गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले , झाडे लावा झाडे जगवा हा उपक्रम राबविला यावेळी अजित गालफाडे मित्र मंडळ व टायगर ग्रुप सदस्य ,प्रदीप होके, वैभव राऊत ,अजिंक्य घोलप, नवनाथ खंडागळे ,अमोल चव्हाण ,राकेश उजगरे ,राजेश कसबे ,अभिजीत पोटभरे ,आकाश गालफाडे ,ईश्वर गालफाडे ,रंजीत गालफाडे ,भोला लोंढे, सुनील खंडागळे ,आदींसह टायगर ग्रुप सदस्य उपस्थित होते. मी केंडेपिंप्री धानोरा यासारख्या छोट्या गावातून आपल्या समाज कार्यास सुरुवात केली आहे गोरगरीब लोकांना माझ्यासारख्या छोट्याशा कार्यकर्त्यांच्या हातून काही तरी मदत मनून मी प्रतेक वेळी माझा वाढदिवस गोरगरीब, वंचित,विद्यार्थी, अनाथ लोक, व रुग्ण यांच्यासोबत साजरा करण्याचा संकल्प केला आहे आणि त्या मुळे या पुढे ही समाज उपयोगी व गोरगरीब जनतेसाठी कल्याणासाठी व उद्धारासाठीच मी काम करणार आहे..

## कवडगाव बु. येथे पिक कर्ज नूतनीकरण करणाऱ्या शेतकऱ्यांचा बँकेने केला सन्मान

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव बु येथे काल महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वडवणी यांचेमार्फत पिककर्ज नुतनीकरण करणार्या शेतकर्यांचा शेतकरी सन्मान सोहळा येथील सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता याचं कार्यक्रमात शाखा व्यवस्थापक मा.परमेश्वर मायकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना व्यवहारांसाठी अनमोल मार्गदर्शन केले.

वडवणी तालुक्यातील कवडगाव बु येथे काल महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वडवणी तर्फे पिक कर्ज नुतनीकरण करणार्या शेतकऱ्यांसाठी शेतकरी सन्मान सोहळा संपन्न झाला यावेळी या गावातील जवळ जवळ ७०टक्के



शेतकरी बांधवांनी आपापले पिक कर्ज नुतनीकरण करून घेतले आहे त्याच बरोबर वडवणी शाखे अंतर्गत येणाऱ्या पिंपरखेड देवडी मोरेवाडी खळवट निमगाव काडिवडगाव येथील शेतकऱ्यांनी ७०टक्के पिक नुतनीकरण करून घेतले आहे त्याबद्दल महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वडवणी चे शाखा व्यवस्थापक मा.परमेश्वर मायकर यांनी नुतनीकरण करणार्या शेतकऱ्यांसाठी त्यांचा सन्मान करण्याचे ठरवले या अनुषंगाने काल कवडगाव बु.येथील सांस्कृतिक सभागृहात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी शाखेचे अधिकारी प्रणय पाटील हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात येथील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली होती या कार्यक्रमात शाखा व्यवस्थापक मायकर यांनी बँकेच्या व्यवहारासंबधी सखोल असे मार्गदर्शन केले या कार्यक्रमात उपस्थित शेतकरी बांधवांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला या कार्यक्रमात गावातील सरपंच शे.बशीरभाई माजी सरपंच संदिपानराव खळगे उपसरपंच अंगदराव काळे चेअरमन कल्याणराव खरात ग्रा पं सदस्य मकसुद पटेल दगडू कानडे सुभाष साळवे बबनराव मांजरे बाबासाहेब काळे जगन काळे आबा काळे कबीर खान पठाण लतिफ पटेल रमेश फुटाणे उत्तमराव नांदुरकर बँक चे कर्मचारी गोरख पंधारे यांच्या सह येथील शेकडो शेतकरी उपस्थित होते या कार्यक्रमात बाबासाहेब राऊत यांनी बहारदार सुत्रसंचलन केले.तर आभार प्रदर्शन लिंबाजी काळे यांनी केले.

### बोधेगाव परिसरात पाणी स्त्रोत वाढल्याने टँकरने पाणी पुरवठा बंद

बीड । प्रतिनिधी

बोधेगाव परिसरात गेल्या १० दिवसापासून पाऊस झाल्यामूळे स्त्रोत वरुन पाणी टँकर जाण्याचा रस्ता हा पूणत खचला आहे. त्यामुळे सदरील स्त्रोतावरुन पाणी पुरवठा करणे शक्य नाही तसेच पाऊस पुरेसा झाल्यामुळे गावातील पाणी पुरवठा स्त्रोताला पाणी आले असल्याने सध्या टँकरची आवश्यकता नाही, असे ग्रामपंचायत सिरसाळा यांनी कळविले आहे. सदरील टँकर दि. १२ जून २०२४ पासून बंद करण्यात आले असल्याचे परळी वैद्यनाथ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.



**म्हसोबावाडी : युवा नेते तथा सामाजिक कार्यकर्ते ॲड रिजवान शेख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, माजी ग्रा.प. सदस्य अन्सार सय्यद, पत्रकार संदीप जाधव, माजी ग्रा.प सदस्य विजय साठे, भैरव चव्हाण,शिक्षक राजेंद्र लाड, बबलु आखाडे, विकास मस्के, संभाजी घाटविसावे, जिशान सय्यद,आयाज कुरेशी, अदनान सय्यद आदी दिसत आहेत.**

### कृषी विभागाशी संपर्कासाठी साठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात शेती क्षेत्राच्या दृष्टीने खरीप हंगामाचे महत्व अनन्यसाधारण आहे. राज्यातील शेतकरी खरीपहंगाम यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील असतात. अशावेळी बियाणे, खते व किटकनाशके या निविष्ठांचा पुरवठा वेळेतगुणवत्तापुर्ण व मुबलक प्रमाणात होणे अत्यावश्यक आहे. धनंजय मुंडे, मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य,यांनी खरिप हंगाम २०२४ च्या आढावा सभेमध्ये बियाणे, खते व किटकनाशकांच्या गुणवत्तापुर्ण उपलब्धतेबाबत राज्यातील शेतकरी, वितरक व विक्रेते यांना क्षेत्रीयस्तरावर येणा-या वेगवेगळ्या अडचणींचे निवारण करण्या करिता केलेल्या सुचनेनुसार आयुक्तालयस्तरावर नियंत्रण कक्ष स्थापित करण्यात आला आहे. या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी संपर्काचा क्रमांक (केवळ संदेश पाठविण्याकरिता) ९८२२४४६६५५ उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच कृषि विभागाचा टोल फ्री क्रमांक (तोंडी तक्रार नोंदविण्याकरिता) १८००२३३४००० क्रमांकावर सुद्धा संपर्क करता येईल.

पान १वरून...

### विद्यार्थ्यांनी पालक शिक्षकांच्या

शिक्षण अधिकारी माध्यमिक, अर्जुन भोसले सर भोसले कोचिंग क्लासेसचे संचालक, प्रा.सत्येंद्र पाटील सर, शामसुंदरजी पडुळे उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती बीड यांची मान्यवर म्हणून उपस्थिती लाभली होती. सर्व मान्यवरांनी अनिलदादा फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार कार्यक्रम उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले अनिलदादा जगताप यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालक शिक्षकांचे अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यार्थी तथा पालकांची मोठ्या संख्यमध्ये उपस्थिती होती. याबरोबरच शिवसेनेचे पदाधिकारी, तथा पत्रकार बांधवांची देखील उपस्थिती होती.

अनिलदादा जगताप यांनी गुणवंत विद्यार्थ्यांशी साधला मुक्त संवाद

विद्यार्थ्यांनी यशाचे उंच शिखर गाठल्यास किंवा आयुष्यातील मोठ्यांतमोठी स्वप्नपूर्ती केल्यास देखील आपल्या पालकांना आणि शिक्षकांच्या श्रमांना विसरू नये. कारण त्यांचे तुम्हाला घडवण्यात आणि वाढवण्यात मोलाचे योगदान आहे. इथून पुढे तुमचा प्रवास आणखीन मोठा आणि कठीण आहे. मात्र खचू नका, स्वतःला वेळ द्या, अभ्यासाबरोबर मैदानावर देखील वेळ घालावा. मैदानी खेळमुळे स्वस्थ निरोगी आणि तंदुरुस्त राहते. शरीर तंदुरुस्त राहीले तर तुम्हाला तुमच्या ध्येयपूर्तीसाठी धाव घेता येईल असे सांगत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी अनिलदादा जगताप यांनी शुभेच्छा दिल्या.

### सामाजिक कार्यकर्ते जहांगीर

नुमान कुरेशी रा. बाराभाई गल्ली व एक अनोळखी इसमा विरुद्ध शराफत मिरखॉन तय्यब मिरखान उर्फ जहांगीर पठाण यांचे फिर्यादी वरून अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन मध्ये गुरनं २५२/२०२४ अन्वये भादविचे कलम ३०७,३२६,३२४,३२३, ३४१, ४२७,१४३,१४७,१४८,१४९,५०४, ५०६, नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी फरार आहेत.

## मनोज जरांगे यांच्या तब्येतीची व जीविताची जबाबदारी शासनाने घ्यावी

**आष्टीत मराठा समाज बांधवाकडून तहसीलदारांना दिले निवेदन**

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्य सरकारने सगेसोयरे अधिसूचनेचे कायद्यात रुपांतर करावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी दि.८जुन पासून अंतरवली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले वारंवार उपोषण करण्यास सरकार भाग पाडत आहे त्यामुळे मनोज दादाचा रंगे पाटील यांच्या जीवित्वाची व तब्येतीची जबाबदारी शासनाने घेण्यासाठी आष्टी तालुका मराठा समाज बांधवांकडून तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी एक मराठा कोटी मराठा. आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.



महाराष्ट्रातील मराठा समाजाला सगेसोयरे कायद्याखाली ओबीसी मध्ये समाविष्ट करण्याच्या मागणीचा प्रश्न अनेक वर्षापासून सरकारने प्रलंबित ठेवला आहे.याच मागणी करता अनेक वेळा शासनाकडून खोटी आश्वासने देण्यात आली आहेत. परंतु पूर्तता एकही आश्वासनाची केली गेलेली नाही. प्रत्येक वेळेस सकल मराठा समाजाचे दिशाभूल व फसवणूक करणारे खोटे शासन परिपत्रक काढण्यात आले आहे. अनेक वर्षापासून समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करून सगेसोयरे कायदा मंजूर करण्याच्या मागणीसाठी आंतरवाली सराटी येथे दिनांक ८ जून पासून संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे आमरण उपोषणास बसले आहेत परंतु सतत सतत लोकशाही मार्गाने उपोषण करून जरांगे पाटील यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहील आणि होणाऱ्या परिणामास शासनास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी असेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी आष्टीचे तहसीलदार प्रमोद गायकवाड यांना सकल मराठा समाजाकडून वरील निवेदन देण्यात आले. यावेळी मराठा समाजांनी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करत जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा दिला. यावेळी सुनील रेडेकर, अनिल तात्या ढोबळे, खंडू जाधव ,सागर आमले ,दीपक सोनवणे, भागचंद झांजे ,अशोक पोकळे ,तानाजी जंजिरे,बाबा मुटकुळे,संतोष जाधव ,साईनाथ पोकळे,राजू वारगुंळे ,अविनाश जगताप अभिषेक हंबर्डे, आदी सह मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तहसीलदारांनी अर्धा तास ठेवले ताटकळत

मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने आष्टी तहसील कार्यालयात सकाळी ११:३० वाजण्याच्या सुमारास निवेदन देण्यासाठी आले असता तहसीलदार प्रमोद गायकवाड हे आत मध्ये आमदार बाळासाहेब आजबे यांच्या आढावा बैठकीत बसलेले होते. मराठा समाज बांधव तहसीलच्या दारात किमान अर्धा तास बसले तरीही तहसीलदार निवेदन घेण्यासाठी मात्र आढावा बैठकीतून बाहेर आले नाहीत. अर्ध्या तासानंतर तहसीलदार साहेब निवेदन घेण्यासाठी बाहेर आल्यानंतर मराठा समाज बांधवांनी मोठा संताप व्यक्त केला.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि.१४ जून २०२४


# महाराष्ट्रात खरंच पाऊस विश्रांती घेणार का?

## पंजाबराव डख यांनी दिली मोठी माहिती

राज्यातील विविध भागात सध्या पाऊस पडत आहे. काही भागात मुसळधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळालं होतं. दरम्यान, महाराष्ट्रातील पावसाबाबत हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी नवीन अंदाज वर्तवला आहे. पंजाबराव यांनी दिलेल्या माहितीनुसार १३ जून पासून ते १५ जून पर्यंत राज्यात भाग बदलत पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे. तसेच त्यांनी सध्या पावसाचा कुठलाच खंड पडणार नसल्याचे पंजाबराव डख यांनी म्हटलं आहे.

राज्यात २२ जून पर्यंत पाऊस सुरू राहणार

पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात २२ जून पर्यंत पाऊस सुरू राहणार आहे. महाराष्ट्रात भाग बदलत पाऊस पडतच राहणार आहे. आज एका तालुक्यात तर उद्या दुसऱ्या तालुक्यात अशा तऱ्हेने पाऊस पडत राहणार असल्याचे पंजाबराव डख म्हणाले. १५ जूनपासून ते १७ जून पर्यंत राज्यातील काही भागांमध्ये पावसाची उघडीप राहणार आहे. परंतू, या कालावधीतही विदर्भात पाऊस सुरूच राहणार आहे. आजपासून १५ जून पर्यंतच्या काळात पश्चिम महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात मोठा पाऊस पडण्याची शक्यता पंजाबराव डखांनी वर्तवली आहे.

ओढे, नाले भरुन वाहणार



पंजाबराव डखांनी दिलेल्या माहितीप्रमाणे अगदी ओढे, नाले भरुन वाहतील अशा स्वरूपाचा हा पाऊस राहणार आहे. विदर्भातही आता पावसाला सुरुवात होणार आहे. तसेच २० तारखेपर्यंत विदर्भातील शेतकऱ्यांच्या देखील पेरण्या सुरू होतील असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. पूर्व आणि पश्चिम विदर्भात १२ जून ते २२ जून या दहा दिवसांच्या कालावधीत चांगला पाऊस पडण्याची शक्यता पंजाबराव डखांनी व्यक्त केली आहे. तसेच मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात पुढील चार दिवस पावसाची शक्यता आहे. या' जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता

दरम्यान, पंजाबराव डखांनी दिलेल्या माहितीप्रमाणं आगामी तीन-चार दिवस राज्यातील सोलापूर, सातारा, सांगली, अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव, बुलढाणा, जालना, परभणी, अकोला, हिंगोली, वाशिम, नांदेड, लातूर, बीड या जिल्ह्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे. या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी असं आवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे.


या जिल्ह्यांमध्ये खूपच जोरदार पावसाची शक्यता

डखांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार, सोलापूर, धाराशिव, सांगली आणि बीड या जिल्ह्यात खूपच जोरदार पावसाची शक्यता आहे. या जिल्ह्यातील काही छोटी मोठी तळे देखील या कालावधीत भरु शकतात असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

# शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा करणं हेच मिशन

## पदभार स्वीकारताच काय म्हणाले नवीन कृषीमंत्री ?

अन्नदात्याच्या जीवनमानात सुधारणा करण हे मंत्रालयाचं मिशन असले पाहिजे, असं वक्तव्य नवीन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं. शिवराज सिंह चौहान यांनी आज अधिकृतरित्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारला त्यानंतर ते बोलत होते. आमचं सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शक्य असलेले प्रत्येक पाऊल उचलेल असेही चौहान म्हणाले. ९ जून रोजी पंतप्रधानांसह सरकारमधील नवीन मंत्र्यांनी शपथ घेतली. यावेळी शिवराज सिंह चौहान यांना कृषीमंत्रीपद दिलं आहे. केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारला. यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी चौहान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या निर्णयाचे स्वागत केले. काल पंतप्रधानांनी पहिलाच निर्णय हा शेतकऱ्यांच्या हिताचा घेतला आहे. पंतप्रधान मोदींनी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या १७ वा हप्ता देण्याच्या निर्णयावर सही केल्याचे चौहान म्हणाले. पंतप्रधानांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा निर्धार केला आहे आणि सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शक्य असलेले प्रत्येक पाऊल उचलेल, असे ते म्हणाले. गेली १० वर्षे रालोआ सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वचनबद्ध होते. आपले मंत्रालय ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी काम करेल, असेही चौहान म्हणाले.




शिवराज सिंह चौहान यांनी पदभार स्वीकारल्यानंतर मंत्र्यांनी त्यांच्या मंत्रालयातील विविध कार्यालयांना भेट दिली.सफाई कर्मचाऱ्यांसह तिथे विविध स्तरांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसोबत संवाद साधला. शेतकरी कल्याणाचे सरकारचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एक संघ म्हणून काम करण्याचे आणि परस्परांच्या सहकार्याने काम करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केलं. त्यांनी मंत्रालयातील कृषी एकात्मिक आदेश आणि नियंत्रण केंद्राला देखील भेट दिली. देशातील पीक उत्पादन आणि दुष्काळ सज्जतेसह कृषी परिदृश्याचा आढावा घेण्यासाठी विविध सुविधांची पाहणी केली.

पदभार स्विकारल्यानंतर कृषीमंत्र्यांनी घेतली मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक : दरम्यान, शिवराज सिंह चौहान यांनी पदभार स्विकारल्यानंतर मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एक बैठक घेतली. मंत्रालयाच्या कार्यपद्धतीमध्ये पारदर्शकतेची गरज अधोरेखित केली. त्यांनी शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासासाठी सरकारचा जाहीरनामा सुपूर्द केला.त्याची पूर्तता करण्यासाठी काम करण्याचे सर्वांना आवाहन केले. अन्नदात्याच्या जीवनमानात सुधारणा करणे हे मंत्रालयाचे मिशन असले पाहिजे, असेही ते म्हणाले. यावेळी रामनाथ ठाकूर आणि भगीरथ चौधरी यांनी देखील कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

# फळपिक विम्याची मुदत वाढवली

## डाळिंब, काजू, स्ट्रॉबेरी, लिंबूसह अनेक फळांचा समावेश





मुंबई : प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षात राबवण्यासंदर्भात राज्य शासनाने मान्यता दिली आहे. मृग बहार व आंबिया बहारातील ठराविक फळ पिकांचा विमा भरून शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. या हंगामात राज्यात डाळिंब, संत्रा, मोसंबी, चिकू, पेरू, लिंबू, सीताफळ, द्राक्ष, आंबा, पपई, काजू, स्ट्रॉबेरी व द्राक्ष क इत्यादी पिकांचा फळपीक विमा योजनेत सहभाग करण्यात आला आहे. भारतीय कृषी विमा कंपनी, बजाज अलियांज, फ्युचर जनरल आणि युनिव्हर्सल सोम्पो या चार कंपन्यांच्या मार्फत ही योजना राबविण्यात येणार आहे. मृग बहरात द्राक्ष, काजू, संत्रा, पेरू, लिंबू या चार पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत २५ जून निश्चित करण्यात आली आहे. त्याचबरोबर मोसंबी चिकू ३० जून, डाळिंब १४ जुलै तर सीताफळ पिकासाठी ३१ जुलै ही मुदत देण्यात आली आहे.

दरम्यान २०२४ ते २६ या दोन वर्षात राबविण्यात येणाऱ्या फळपिकविमा योजनेचे स्वरूप, विमा संरक्षित रक्कम यांसह सविस्तर माहिती कृषी विभागाकडून जारी करण्यात आली असून, फळ उत्पादक शेतकऱ्यांनी विहित मुदतीत आपला विमा भरून घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. राज्यात काही ठिकाणी चांगला पाऊस पडला असून शेतकऱ्यांनी पेरणीच्या पूर्वतयारीला सुरुवात केली आहे. त्यामुळे राज्यात बी-बियाणे आणि खतांच्या मागणीत वाढ होत आहे. शेतकऱ्यांना युरिया आणि डीएपी खतांचा पुरेसा पुरवठा केला जात असला तरी येणाऱ्या काळात खतांचा तुटवडा जाणवू नये यासाठी राज्य शासनातर्फे खतांचा संरक्षित साठा (बफर स्टॉक) करण्यात येतो. पणन महासंघासह इतर संस्थांनी आवश्यकतेनुसार व प्राप्त उद्दिष्टानुसार आपल्या वाट्याच्या खतसाठ्याची संपूर्ण उचल करावी. तसेच त्यानंतरही आवश्यकता असल्यास कृषी विभागाने पणन महासंघास अतिरिक्त कोटा मंजूर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या मंत्रालयीन दालनात आज पणन महासंघाच्या विविध मागण्यांसंदर्भात बैठक घेतली. या बैठकीस कृषिमंत्री धनंजय मुंडे, पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांसह अधिकारीही उपस्थित होते.

# पावसामुळे बळीराजा सुखावला! नद्या-बंधारे तुडुंब भरले


## जून महिन्याच्या आठवडाभरातच पावसाने सरासरी ओलांडली

सोलापूर : एप्रिल आणि मे महिन्यात दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या बळीराजाला आठवडाभरात झालेल्या पावसाने काहीसा दिलासा दिला आहे. सोलापूर जिल्ह्यात आठवडाभर सर्व दूर पाऊस () पाहायला मिळतोय. तुफान बरसलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील सर्वच नदी, बंधारे तुडुंब भरून वाहत आहेत. जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून करण्यात आलेल्या बंधारांमध्ये मुबलक प्रमाणात पाणी साठा झाला आहे. पावसाने उसंत घेतल्यानंतर जमिनीत पावसाला पुन्हा सुरुवात होताच खरीप पिकाच्या पेरणीला वेग येणार आहे.

सोलापुरात मागील सहा दिवसापासून तुफान पाऊस सुरु आहे. अनेक ठिकाणी सकल भागात पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मोहोळ तालुक्यातील मलिकपेठ ते बिटले रेल्वेच्या बोगद्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे.

जवळपास आठ ते दहा फूट पाणी साचल्याने हा बोगदा सध्या बंद अवस्थेत पडला आहे. मलिकपेठ येथील शेतकरी, विद्यार्थी, नोकरदार वर्ग शहरात जाण्यासाठी याच मार्गाचा वापर करतात. मात्र मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांना रेल्वेच्या रुळ ओलांडून जावे लागत आहे.





या बोगद्यामधून पाण्याचा निचरा कायमस्वरूपी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने व्यवस्थित यंत्रणा केली नाही असा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

जून महिन्याच्या आठवडाभरातच पावसाने सरासरी ओलांडली

सोलापूर जिल्ह्यात मागील सहा दिवसापासून सतत पाऊस पडत आहे त्यामुळं जून महिन्याच्या सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद या आठवड्याभरात झाली आहे. सोलापुरात अनेक वर्षानंतर जून महिन्याच्या सुरुवातीला चांगला पाऊस पडत असल्याचे चित्र आहे. सोलापूर जिल्ह्यात जून महिन्यात एकूण १०२ मिलिमीटर पाऊस पडणे अपेक्षित असताना कालपर्यंत १०३ मिलिमीटर इतका पाऊस पडला आहे. पुढील काही दिवस देखील हे पाऊस असेच असण्याची शक्यता हवामान खात्याच्या वतीने वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे एप्रिल मे महिन्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झालेल्या सोलापुरात बदललेल्या वातावरणामुळे बळीराजा सुखावला आहे.

आठवड्याभरापासून सलग पाऊस, भाजीपाल्यांचे दर कडाडले

मागील आठवडाभरापासून सोलापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे एकीकडे दिलासा मिळाला असताना दुसरीकडे भाजीपाल्याचे दर कडाडलेले पाहायला मिळत आहेत. पावसामुळे भाजीपाला मोठ्या प्रमाणात खराब झाल्यामुळे बाजारात कच्चा भाजीपाल्याचे दर वाढले आहेत. कोथिंबीर, टोमॅटो, मिरची, भेंडी, गवार आदींचे दर वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसणार आहे. होलसेल मार्केटमध्ये टोमॅटो २० ते ३० रुपये प्रति किलो तर किरकोळ मार्केटमध्ये टोमॅटो पन्नास रुपये प्रति किलो दराने विकले जात आहेत. अनेक शेतकऱ्यांची कोथिंबीर ही जागीच खराब झाल्याने कोथिंबीर प्रतिपेंडी चाळीस रुपयांवर पोहोचली आहे. हिरव्या पालेभाज्यांमध्ये शेपू, मेथी २५ ते ३० रुपयांना पोहोचली आहे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

- ११५८ : इसार नदीच्या काठावर म्यूनिच शहर स्थापन केले.
- १७०४ : मुघलांच्या कैदेत असलेल्या संभाजीराजे यांच्या मुलाचे औरंगजेबाने लग्न लावून दिले.
- १७७५ : अमेरिकन सैन्य दलाची स्थापना करण्यात आली.
- १७७७ : अमेरिकेने 'स्टार्स अँड स्ट्राइप्स' या ध्वजाचा स्वीकार केला.
- १७८९ : मक्यापासुन पहिल्यांदाच 'व्हिस्की' तयार करण्यात आली. तिला 'बोर्बोन' असे नाव देण्यात आले कारण तयार करणारा रेव्हरंड क्रेग हा केंटुकी प्रांतातील 'बोर्बोन' येथील रहिवासी होता.
- १८९६ : महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 'अनाथ बालिकाश्रम' ही संस्था स्थापन केली. यातुनच पुढे कर्वे स्त्री शिक्षण संस्था, एस. एन. डी. टी. विद्यापीठ असे मोठमोठे उपक्रम सुरू झाले.
- १९०१ : पहिल्यांदा गोल्फ खेळाची प्रतियोगिता अमेरिकेत आयोजित करण्यात आली.
- १९०७ : नॉर्वेत स्त्रियांना मतदानाचा अधिकार.
- १९२६ : ब्राझील लीग ऑफ नेशन्समधून बाहेर.
- १९३४ : ऑस्ट्रिया देशाची राजधानी वियना येथे जर्मन शासक हिटलर आणि मुसोलिनी यांची भेट झाली.
- १९३८ : सुपरमॅनची चित्रपट कथा पहिल्यांदा प्रकाशित.
- १९४० : जर्मनीने पॅरिस ताब्यात घेतल्यामुळे दोस्त राष्ट्रांनी तिथुन माघार घेतली.
- १९४५ : भारताला स्वायत्तता देण्यासंबंधीची वेव्हेल योजना जाहीर
- १९५२ : अमेरिकेने अणुशक्तीवर चालणारी पहिली पाणबुडी यू. एस. एस. नॉटिलस बांधण्यास सुरुवात केली.
- १९६२ : पॅरिसमध्ये युरोपियन अंतराळ संशोधन संस्था स्थापन झाली नंतर युरोपियन स्पेस एजंसी बनली.
- १९६७ : चीनने पहिल्या 'हायड्रोजन बॉम्ब' ची चाचणी केली.
- १९६७ : मरिनर अंतराळ यान शुक्राकडे प्रक्षेपित.
- १९७२ : डी. डी. टी. या कीटकनाशकाच्या वापरावर अमेरिकेत बंदी घालण्यात आली.
- १९९९ : दक्षिण आफ्रिकेचे पहिले श्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांचा कार्यकाळ संपला.
- २००१ : ए. सी. किंवा डी. सी. यापैकी कोणत्याही विद्युतप्रवाहावर चालणार्या उपनगरी गाडीचा शुभारंभ पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक वासुदेव गुप्ता यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १३९८ : संत कबीर.
- १४४४ : भारतीय खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ निळकंथा सोमायाजी यांचा जन्म.
- १७३६ : चार्ल्स कुलोम फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ ऑगस्ट १८०६)
- १८६४ : अलॉइस अल्झायमर जर्मन मेंदुविकारतज्ञ (मृत्यू: १९ डिसेंबर १९१५)
- १८६८ : कार्ल लॅन्ड्स्टायनर नोबेल पारितोषिक विजेते ऑस्ट्रियन जीवशास्त्रज्ञ (मृत्यू: २६ जून १९४३)
- १८९९ : महावीर चक्र सन्मानित माजी भारतीय सैन्य अधिकारी ब्रिगेडियर राजिंदर सिंह यांचा जन्मदिन.
- १९०० : भारतीय निबंध लेखक आणि मल्याळम साहित्यांचे साहित्यिक समीक्षक कारिककट्ट मराठू कुट्टिकृष्ण मरार यांचा जन्मदिन.
- १९१६ : माजी भारतीय लष्कर प्रमुख अधिकारी दिवान प्रेम चंद यांचा जन्मदिन.
- १९२० : प्रख्यात जैन धर्मीय स्वेतंबर तेरापंथ आदेशाचे दहावे प्रमुख, संत, योगी, अध्यात्मिक नेते, तत्वज्ञ, लेखक, वक्ते आणि कवी आचार्य श्री महाप्रज्ञ यांचा जन्मदिन.
- १९२२ : के. असिफ हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक (मृत्यू: ९ मार्च १९७१)
- १९४६ : अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांचा जन्मदिन.
- १९५५ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट व दूरदर्शन मालिका अभिनेत्री, गायक, मनोरंजन निर्माता, टीव्ही टॉक शो होस्ट आणि भारतीय जनता पक्षाच्या सदस्या किरण अनुपम खेर यांचा जन्मदिन.
- १९५९ : लोकप्रिय भारतीय तेलगु भाषिक वक्ता व सनातन धर्मीय भाष्यकार चगंती कोटेश्वरा राव यांचा जन्मदिन.
- १९६७ : प्रसिद्ध भारतीय अब्जाधीश उद्योगपती आणि आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला यांचा जन्मदिन.
- १९६८ : प्रसिद्ध भारतीय महाराष्ट्रीयन राजकारणी तसचं, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक, अध्यक्ष राज ठाकरे यांचा जन्मदिन.
- १९६९ : साली प्रसिद्ध जर्मन माजी व्यावसायिक टेनिसपटू स्टेफनी मारिया यांचा जन्मदिन. त्यांनी आपल्या कारकिर्दीत एकूण २२ ग्रँड स्लॅम एकेरीचे जेतेपद जिंकले आहे.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १८२५ : पिअर चार्ल्स एल्फांट वॉशिंग्टन शहराचे रचनाकार फ्रेन्च अमेरिकन वास्तुविशारद आणि स्थापत्य अभियंता (जन्म: ९ ऑगस्ट १७५४)
- १९१६ : गोविंद बल्लाळ देवल आद्य मराठी नाटककार, स्वतंत्र मराठी लेखन आणि इंग्रजी, फ्रेन्च व संस्कृत नाटकांची भाषांतरे इ. अनेक प्रकार त्यांनी हाताळले होते. (जन्म: १३ नोव्हेंबर १८५५)
- १९२० : मॅक्स वेबर जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ (जन्म: २१ एप्रिल १८६४)
- १९४६ : जॉन लोगीबेअर्ड, ब्रिटिश शास्त्रज्ञ, आद्य दुरचित्रवाणी संशोधक.
- १९६१ : प्रसिद्ध भारतीय नोबल पारितोषिक वेजेते भौतिकशास्त्रज्ञ सी. वी. रमण यांचे शिष्य भौतिकशास्त्रज्ञ सर करिमानीक्कम श्रीनिवास कृष्णन यांचे निधन.
- १९८९ : सुहासिनी मुळगांवकर अभिनेत्री व संस्कृत पंडित, मराठी रंगभूमीवरील एकपात्री नाट्यप्रयोगांची सुरुवात त्यांनी केली. ३१ जानेवारी १९६० रोजी 'सौभद्र' नाटकाचा पहिला एकपात्री प्रयोग त्यांनी केला. या नाटकाचे त्यांनी विक्रमी ५०० प्रयोग केले. (जन्म: ????)
- २००७ : कुर्त वाल्ढहाईम संयुक्त राष्ट्रांचे चौथे सरचिटणीस (जन्म: २१ डिसेंबर १९१८)
- २०१० : मनोहर माळगावकर इंग्रजी लेखक (जन्म: १२ जुलै १९१३)
- २०११ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित रुद्विणा वादक भारतीय संगीतकार असद अली खान यांचे निधन.
- २०२० : बॉलीवूड एक्टर सुशांत सिंग राजपुत यांच निधन.

# ॲट्रॉसिटी प्रकरणातील आरोपी मोकाट, उलट बौद्ध समाजावरच दरोड्याचे गुन्हे दाखल

## खोटे गुन्हे रद्द करा अन्यथा समाजाचा आंदोलनाचा इशारा

परळी । प्रतिनिधी

परळी पासून जवळच असलेल्या मौजे दाऊतपूर येथील बौद्ध समाजाच्या तरुणांना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण झाल्याची घटना पंधरा दिवसापूर्वी घडली होती. याप्रकरणी आरोपीविरुद्ध अट्रॉसिटीसह इतर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या ॲट्रॉसिटी प्रकरणातील सर्व आरोपी अद्याप मोकाट फिरत आहेत. परंतु पोलिसांनी आरोपीशी संगणमत करून उलट बौद्ध समाजातील तरुणावरच आणि सामाजिक कार्य करणाऱ्या शिक्षकावर खोटे ३९५ यासारखे दरोड्याचे व इतर गुन्हे दाखल केल्याने बौद्ध समाजात संतापाची लाट उसळली आहे. सदर खोटे गुन्हे रद्द करावे अन्यथा पोलिसांच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बौद्ध संघर्ष समिती, वंचित बहुजन आघाडी व इतर आंबेडकरवादी पक्ष आणि संघटनांनी दिला आहे. तर गेले दोन दिवसापासून दाऊतपूर येथील बौद्ध समाजाच्या महिला व पुरुष उपविभागीय कार्यालयासमोर झालेल्या अन्यायाविरुद्ध न्याय मागण्यासाठी उपोषणाला बसलेल्या आहेत.



परळी तालुक्यातील दाऊतपूर येथे दिनांक २४ मे रोजी बौद्ध तरुणांना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली होती. याप्रकरणी आकाश अश्रुबा मुंडे यांच्या फिर्यादीवरून त्यावेळी मारुती उत्तम काचगुंडे, ज्ञानदेव बाबुराव काचगुंडे ,खंडू उत्तम काचगुंडे, वैजनाथ बाबुराव काचगुंडे यांच्या विरोधात ॲट्रॉसिटीसह इतर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणातील आरोपींना परळी ग्रामीण पोलिसांनी अद्याप पर्यंत अटक केलेले नाही. यातील मारूती उत्तम काचगुंडे यांच्यावर ३०२ सारखा गंभीर गुन्हा असल्याचे समजते ही गंभीर बाब आहे. त्याला पोलिसांचा अभय आहे की काय असा संशय निर्माण होत आहे. दरम्यान आरोपींशी संगणमत करून उलट दिनांक ९ जून रोजी मारहाण झालेल्या बौद्ध युवकावरच परळी ग्रामीण पोलिसांनी ज्ञानेश्वर बाबुराव काचगुंडे यांच्या फिर्यादीवरून कलम ३९५, ३४१, ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादवी अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. याप्रकरणी न्याय मिळावा म्हणून दाऊतपूर येथील बौद्ध समाजाच्या अनुसया भालेराव, सुमित सुरवसे ,आशाबाई सुरवसे, सुनीता मुंडे, मंदाबाई मुंडे, बाबुराव मुंडे, लंकाबाई मुंडे, पूजा मुंडे, शंकर मुंडे आदी बौद्ध समाजाचे महिला, पुरुष गेल्या दोन दिवसापासून परळी उपविभागीय कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. तसेच दाखल करण्यात आलेले खोटे ३९५ चे गुंन्हे मागे घेण्यात यावेत, ॲट्रॉसिटी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी व दाऊतपूर येथील बौद्ध समाजाला पोलीस संरक्षण द्यावे आदी प्रमुख मागण्यासह उपोषणाला बसले आहेत. दरम्यान या प्रकरणी दाऊतपूर ॲट्रॉसिटी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करा, दाखल करण्यात आलेले ३९५ व इतर बहुजन समाजावरील गुन्हे रद्द करावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा एका निवेदनाद्वारे या बौद्धजन संघर्ष समिती,व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परळी उपविभागीय अधिकारी तसेच परळी तहसीलदारांन देण्यात आले आहे.

## अविनाश कदम यांना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै.लोकमत, मराठवाडा साथी वृत्तपत्रांचे तालुका प्रतिनिधी अविनाश कदम हे मागील गेल्या १५ वर्ष पत्रकारिता क्षेत्रांमध्ये कार्यरत असून अनेक सामाजिक व गोरगरीब सर्वसामान्यांच्या, विविध घटकांतील प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम व न्याय मिळवून देण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून करत असून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने आयोजित शिवराज्याभिषेकाच्या गौरवशाली दिनानिमित्त महाराष्ट्र स्वाभिमान गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती अध्यक्ष प्रकाश जाधव व सचिव सुरज भोईर यांनी दिली.



मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने शिवराज्याभिषेकाच्या गौरवशाली दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्यात येत असतात. या वर्षीचा २०२४ चा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार अविनाश कदम यांना जाहिर झाला असून लवकरच दि.२३ जून २०२४ रोजी मुंबई पत्रकार संघ येथील पत्रकार भवन आझाद मैदानाजवळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तर अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने धार्मिक, सामाजिक, साहित्य,कला, क्रीडा, पत्रकारित, कृषी व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव राज्यस्तरीय उत्कृष्ट पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.यंदाचा पत्रकारितेचा पुरस्कार आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै.लोकमत व मराठवाडा साथी वृत्तपत्रांचे तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांना जाहिर झाला असून ते मागील पंधरा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात असून राजकीय, सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, कला, क्रीडा, धार्मिक विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रकाश झोतात आणण्याचे काम ते मागील पंधरा वर्षापासून करत असून त्यांनी गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याचे काम केले आहे. पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार अविनाश कदम यांना जाहीर झाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवर स्वागत करत असून व सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## अनाथ व ऊसतोड मजुरांच्या मुलांना मिळणार मोफत शिक्षण

परळी । प्रतिनिधी

मानवी जीवनाला परिष्कृत आणि सर्वसमावेशक सामाजिक उत्थान प्राप्त करून देण्यासाठी शिक्षण आणि संस्कार हे मुलभुत घटक आहेत संस्कारयुक्त जीवनानेच मानवी जीवनाला विविध पैलू पडून असे व्यक्तिमत्वच जगाच्या कल्याणासाठी प्रयत्न करू शकते.अशा प्रकारची सामाजिक उत्तरदायित्व निभावनारी पिढी ही काळाची गरज लक्षात घेऊन श्री क्षेत्र नर्मदेश्वर प्रतिष्ठान ने श्री ज्ञानगंगा गुरूकुलच्या माध्यमातून अनाथ, वंचित, उपेक्षित, कष्टकरी, शेतकरी, आणि ऊसतोड मजुरांच्या मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच अध्यात्मिक शिक्षणाची मोफत (विनामूल्य) सोय करण्याचे ठरवले आहे.२१ जून पर्यंत ही प्रवेश प्रक्रिया चालणार असून अभ्यासु व होतकरू विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे.



श्री क्षेत्र नर्मदेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष आचार्य अर्जुन महाराज शास्त्री हे गत चार वर्षांपासून अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालून एक संस्कारयुक्त पिढी निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्न करत आहेत.त्यामध्ये सतत विनामूल्य बालसुसंस्कार शिबिर, अन्नदान,रक्तदान, वृक्षारोपण, आणि मातोश्री मणिकर्णिका गौशाळेच्या माध्यमातून शास्त्रीजींनी केलेले गोरक्षण हे संपुर्ण समाजाच्या दृष्टिने कौतुकाचा विषय ठरलेला आहे. अलिकडच्या काळात पालक आपल्या पाल्यांना सुशिक्षित करण्यासाठी अति संवेदनशील आहेत ही बाब अतिशय कौतुकास्पद आहे. पण खेद या गोष्टीचा वाटतो की बालकांच्या सुसंस्कारांकडे पालकांनी फार दुर्लक्ष केलेले आहे. आणि कटु सत्य हे आहे कि संस्कारहीन सुशिक्षितता ही समाज विघातक असते.अशी कुपोषित सुशिक्षितता ना कुटूंब ऊभा करू शकते ना समाज. संस्कारहीन तरूण पिढी ही व्यसनाधीन होत चाललेली आहे तसेच वाईट मार्गांकडे प्रवृत्त होऊन परिणामी स्वतःच्या आणि समाजाच्या नाशास कारण ठरत आहे.


आळंदी तसेच देवभुमि ऋषिकेश (उत्तराखंड) मधील गुरुवर्यांसमोर बसून तब्बल १६ वर्षे जे अध्ययन केले त्याचा लाभ जन्मभूमितील विद्यार्थ्यांना व्हावा हा उदात्त हेतु अंतःकरणात धारण करून हा उपक्रम राबवला आहे. जेव्हा जेव्हा सामाजिक हीत जोपासण्याची संधी उपलब्ध होईल तेव्हा तेव्हा संकटांचा विचार न करता शेवटच्या श्वासांपर्यंत प्रयत्न करणार आहे. श्री ज्ञानगंगा गुरूकुलम् च्या माध्यमातून निर्माण करून दिलेल्या या सुवर्ण संधीचा विद्यार्थ्यांनी योग्य उपयोग करून ऐहिक आणि पारलौकिक हीत साधावे.

आजकालच्या मुलांना कुत्रे सांभाळण्यात मोठेपणा वाटत आहे परंतु आईवडिलांना सांभाळण्याची त्यांना लाज वाटत आहे.मुले आईवडिलांना वृद्धाश्रमाची वाट दाखवत आहेत. वरील सर्व बाबींचा विचार करून श्री क्षेत्र नर्मदेश्वर प्रतिष्ठान ने श्री ज्ञानगंगा गुरूकुलम्च्या माध्यमातून संस्कारयुक्त सुशिक्षित पिढी घडवण्यासाठी शालेय शिक्षणाबरोबरच अध्यात्मिक शिक्षणाची मोफत (विनामूल्य) सोय करण्याचा निर्णय घेतलेला आहे. देशसेवा, धर्मसेवा, मातृभक्ति, पितृभक्ति आणि नितीमूल्य जोपासणारी पिढी निर्माण करण्यासाठी श्री ज्ञानगंगा गुरूकुलम् प्रयत्न करणार आहे .गुरूकुलम् शैक्षणिक उपक्रमांमध्ये श्रीमद्भगवद्गीता, हनुमानम् चालिसा, हरिपाठ , सुभाषिते ,कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, गायन, मृदंग वादन, योगाभ्यास, संगणकीय प्रशिक्षण, सामान्य ज्ञान, गणित, इंग्रजी व्याकरण, संस्कृत संभाषण कौशल्य, क्रीडा आदि विविध गोष्टी विद्यार्थ्यांना देण्यासाठी प्रयत्न करणार असून आपल्या पाल्यामध्ये या संपूर्ण गुणांचा अंगीकार होण्यासाठी ज्ञानगंगा गुरूकुलम् मध्ये पालकांनी आपल्या पाल्याचा २१ जून अगोदर प्रवेश सुनिश्चित करण्याचे आवाहन ह.भ.प. आचार्य अर्जुन महाराज शास्त्री यांनी केलेले आहे.

## कल्याण लातूर द्रुतगती महामार्ग अविकसित भागातून करण्याची मागणी

धारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या रस्ते बांधकाम विभागाच्या वतीने कल्याण लातूर हा महामार्ग प्रस्तावित आहे सदरील महामार्ग बीड जिल्ह्यातील अविकसित भागातून बनवण्यात यावा अशी मागणी धारूर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते,संस्था आणि ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्रस्तावित असलेला कल्याण-लातूर द्रुतगती महामार्ग कल्याण ते नगर बीड वडवणी चिंचवण किल्ले धारूर आडस अंबाजोगाई मार्गे लातूर या अविकसित भागातून सदरील महामार्ग बनवण्यात असा करण्यात यावा जेणेकरून या अविकसित भागाचा विकास होण्यासाठी या महामार्गाचा उपयोग होईल हा संपूर्ण परिसर आजही विकासापासून कोसो दूर आहे या भागातील ऊसतोड मजुरांची संख्या अधिक असल्याने




उद्योग व्यवसाय व ग्रामीण भागाला चालना मिळण्यासाठी हा महामार्ग या भागातून जाणे अत्यंत गरजेचे आहे बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करावा अशी ही मागणी सामाजिक कार्यकर्ते,संस्था आणि ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आली आहे

लहान-मोठी गावे विकासाच्या मार्गावर येतील..धारूर घाटाचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल. बीड अंबेजोगाई तालुक्यातील बहुतांश लहान मोठी गावे व शहरे राज्यातील प्रमुख विकसित मोठ्या उद्योग व्यवसाय असणाऱ्या शहराला जोडली जावीत या माध्यमातून या तालुक्यातील लहान-मोठी गावे विकासाच्या मार्गावर येतील. किल्ले धारूर येथील घाट विकसित होणे गरजेचे आहे या घाटात आजपर्यंत शंभरच्या आसपास नागरिकांना आपले जीव गमवावे लागले आहेत त्यामुळे हा महामार्ग येथून गेल्यास अरुंद घाटाचा विकास होऊन दळणवळण सुरळीत होण्यास मदत मिळेल. ,महाराष्ट्र राज्य यांचा प्रस्तावित कल्याण-लातूर महामार्ग, हा महामार्ग कल्याण - आहिल्यादेवी नगर -बीड -- वडवणी - चिंचवन- किल्ले धारूर -आडस - अंबाजोगाई - लातूर असा निर्माण करणेबाबत उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,एमएसआरडीसी ,मुंबई यांना तालुक्यातील विविध संस्था तसेच सामाजिक संघटना यांच्या वतीने मोठ्या संख्येने निवेदने आज मुंबई येथील कार्यालयात भेटून समक्ष देण्यात आली असता सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून आता स्थानिक नेत्रुत्वाकडून भरभक्कम पाठपुरावा केल्यास या कामाला गती प्राप्त होईल अशी मागणी तालुका सामाजिक कार्यकर्ते, संस्था आणि ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आली आहे.धारूर शहरातील सामजिक कार्यकर्ते गौतमराव शेंडगे, विश्वानंद तोष्णीवाल, प्रा.सुरेश मैंद,सुदर्शन दळवी व संदीप शिनगारे यांनी एमएसआरडीसी चे व्यवस्थापकीय संचालक अनिल कुमार गायकवाड याच्या कडे निवेनाद्वारे मागणी.

## प्रभावती गावरस्कर यांचे निधन

बीड/प्रतिनिधी

येथील दैनिक सुराज्यचे संपादक सर्वोत्तम वसंतराव गावरस्कर यांच्या मातोश्री प्रभावती वसंतराव गावरस्कर यांचे दिर्घ आजाराने पुणे येथे दि.१२ रोजी संध्याकाळी ९ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्षाचे होते. प्रभावती गावरस्कर या अतिशय मनमिळावू स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात ३ मुले आणि दोन मुली, सुना,नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.





**बीड : अरुणराव चौरे यांची मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सदस्य पदी निवड झाल्याबद्दल, हिंद मैत्री ग्रुप बीड सर्व सदस्यांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बहुसंख्य सदस्य उपस्थित होते व सर्वांनी त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.**

## आदित्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची कृषी क्षेत्र अधिकारी म्हणून निवड

बीड । प्रतिनिधी

येथील आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी शिवप्रकाश गुंजकर याची कृषी क्षेत्र अधिकारी म्हणून पंजाब नॅशनल बॅंकेमध्ये निवड झाली आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी शिवप्रकाश गुंजकर याची पंजाब नॅशनल बॅंकेमध्ये कृषी क्षेत्र अधिकारी म्हणून निवड झाली आहे. शिवप्रकाश गुंजकर याने आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातून सन २०१९ मध्ये बी टेक कृषी अभियांत्रिकी ही पदवी घेतलेली आहे.

महाविद्यालयात गुंजकर याला मिळालेल्या मार्गदर्शनामुळे तो आज अधिकारी झाला. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी शिक्षणाबरोबर विद्यार्थांना नौकरीसंदर्भात मार्गदर्शन केले जाते. महाविद्यालयामध्ये घेतलेल्या स्पर्धा परीक्षेच्या तासिका व प्राचार्य, प्राध्यापक यांचे वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळे आज शिवप्रसाद गुंजकर कृषी क्षेत्र अधिकारी म्हणून सरकारी नोकरीस पात्र ठरला आहे. गुंजकर यांनी केलेल्या कठोर परिश्रमाचे आदित्य शिक्षण संस्था व आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक यांनी अभिनंदन केले.

## टूर्स अँड ट्रव्हल्सकडून उमराह साठी गेलेल्या जोडप्याची फसवणूक

### सखोल माहिती घेऊनच हज, उमराहला जावे - सय्यद मैनोद्दीन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील नेकनूर गावात राहणारे सय्यद मैनोद्दीन सय्यद खाजा हे उमराहसाठी मक्का-मदिना येथे जाऊन आले परंतु ते ज्या ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून उमराह साठी गेले होते, त्याने या जोडप्याकडून पैसे तर पूर्ण घेतले परंतु पुढे न पाठविल्याने त्यांची मक्का-मदीना यात्रा त्रासातच संपन्न झाली. त्यांना जवळ जास्त पैसे नसल्याने हॉटेलच्या व्हरंड्यात दिवस काढावे लागले. उमराह करून आल्यानंतर त्यांनी संबंधित ट्रॅव्हल्स एजंटला उर्वरित १ लाख ७० हजार ची रक्कम परत देण्यास सांगितले असता त्याने अजूनही ही रक्कम परत दिली नाही तसेच देण्यास टाळाटाळ करू लागला. यामुळे वाट पाहून पाहून थकलेल्या सय्यद मैनोद्दीन यांनी पोलिसात धाव घेऊन तक्रार दाखल केली आणि हज उमराहसाठी जाणाऱ्यांनी सखोल माहिती घेऊनच जावे असे आवाहन देखील केले आहे.

सध्या मुस्लिम बंधू-भगिनी मोठ्या संख्येने जगभरातून हज यात्रेसाठी जात आहेत. हज साठी जाताना काही जण शासकीय कोट्यातून जातात तर काही खाजगी ट्रॅव्हल्स एजन्सीच्या माध्यमातून जातात. तसेच उमराहसाठी सुद्धा जातात. अशाच प्रकारे शासकीय सेवेतुन कनिष्ठ अभियंता म्हणुन निवृत्त झालेले सय्यद मैनोद्दीन यांनी मार्च-२०२४ मध्ये उमराहसाठी सपत्नीक जाण्याकरिता बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील मुस्लिम धर्मगुरू शब्बीर मौलाना यांच्यामार्फत पुणे येथील अल्? खमर इंटरनॅशनल टूर्स अँड ट्रॅव्हल्स, ऑफिस क्रमांक २८, चौथा मजला, भक्ति कॉम्प्लेक्स, हॉटेल अल्पाइन, खरालवाडी, पिंपरी चिंचवड येथील शेख रहीम शेख अमीन याच्याशी फोनवरून संपर्क केला. यावर शेख रहीम याने त्यांना एक व्यक्तीस १ महिन्याची तिर्थयात्रा उमराह मदीना प्रत्येकी रक्कम रु. १,३०,०००/- लागतील असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांना टूर्सवाल्याने ऑनलाईन फोन पे वरुन प्रत्येकी रक्कम रु. १,३०,०००/- प्रमाणे स्वतःसह पत्नीचे मिळून एकूण रक्कम रु.२,६०,०००/-पाठविण्यास सांगितले. म्हणून त्यांनी फोन पे वरून दिनांक २३ डिसेंबर २०२३ रोजी अल्? खमर टूर्स अँड ट्रॅव्हल्स च्या खात्यावर रक्कम रु.२,६०,०००/- पाठविले. त्यानंतर आणखी चलन बदलुन मिळण्यासाठी रक्कम रु. ४०,०००/ - मागितले ते ही त्यांनी फोन पे वरुन पाठविले. अल्? खमर टूर्स अँड ट्रॅव्हल्स वाल्याने एक महिन्याकरीता उमराह करीता पैसे स्विकारले. ज्यात विमान फी, व्हिजा, मक्का येथील हॉटेल व जेवणाचा खर्च इत्यादी करीता होणाऱ्या खर्चाचा समावेश होता. यानंतर दिनांक १२ मार्च २०२४ रोजी मुंबई विमानतळावर ते पत्नीसह गेले.

तिथे त्यांना विमानाचे दोन तिकीट देण्यात आले व कर्नाटक राज्यातील विजापुर येथील दुसऱ्या ट्रव्हल्स वाल्याच्या हवाली केले. दुसऱ्या ट्रव्हल्सवाला त्यांना विमानात बसवुन मक्का सौदी अरेबिया देशात घेऊन गेला. मात्र तिथे हॉटेलमध्ये रुम दिली नाही. कारण पुणे येथील अल्? खमर टूर्स अँड ट्रॅव्हल्स वाल्याने हॉटेलचे भाडेच भरले नव्हते. त्यांनी कसेबसे १२ ते १३ दिवस हॉटेलच्या व्हरांड्यात काढले. टूर्स वाल्याने चलन बदलीच्या नावाने घेतलेले रक्कम रु. ४०,०००/- चे चलन देखील बदलुन दिले नाही. अशाप्रकारे सय्यद मैनोद्दीन यांचे अल्? अमर टूर्स अँड ट्रव्हल्सवाल्याकडून एकुण रक्कम रु.१,७०,०००/- येणे बाकी आहेत. अल्? खमर टूर्स अँड ट्रॅव्हल्स वाल्याने त्यांची ही रक्कम परत न दिल्याने झालेल्या आर्थिक फसवणुक प्रकरणी सय्यद मैनोद्दीन यांनी अल्? खमर टूर्स अँड ट्रॅव्हल्स विरुध्द कायदेशीर तक्रार केली असून संबंधित टूर्स अँड ट्रॅव्हल्स चालकाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करून रु.१,७०,०००/- रुपयांची रक्कम परत मिळवून द्यावी अशी विनंती अप्पर पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनातून केली असून हज उमराह साठी जाणाऱ्या मुस्लिम बांधव आणि भगिनींना सय्यद मैनोद्दीन यांनी विनंती केली आहे की, हज आणि उमराह साठी जाताना ज्या टूर्स आणि ट्रॅव्हल्स च्या माध्यमातून जात आहेत, त्याच्याकडे रक्कम सोपविण्यापूर्वी त्याच्याबद्दल सखोल माहिती घ्या.

खात्री पटल्यानंतरच रक्कम जमा करा. तसेच संबंधित टूर्स अँड ट्रॅव्हल्स सोबत आर्थिक व्यवहार थेट करावा. कोणत्याही दलालाच्या मध्यस्थीने करू नये. अन्यथा माझ्यासारखाच आर्थिक फटका बसून यात्रेतही हाल होतील असे म्हटले आहे.

## देशातील विद्यार्थ्यांना वेठीस का धरता-आयुब पठाण

बीड । प्रतिनिधी

इसवी सन २०२४ मध्ये नीट परीक्षेत महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य राज्यांमध्ये परीक्षा घेणाऱ्या सदस्यांना मॅनेज करून मोठा घोळ घालण्यात आला आहे. यामुळे कष्ट करून मार्क घेणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय झाला आहे. हा प्रकार झाला आहे. पैसा असणाऱ्या बलाढ्य शक्तीनी हा प्रकार केला असून ज्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना एक सारखे गुण आणि ग्रेसमार्क देण्यात आले आहेत त्या परीक्षा केंद्रावरील नीट ची पुनपरीक्षा घेऊन देशातील गोरगरीब विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष आयुब पठाण यांनी केली आहे.



देशात हफ्तेखोरी, लाचखोरी मोठ्या प्रमाणात बळवली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना सुद्धा विठीस धरण्याचे काम प्रशासनाकडून होत असून लाखोंची संपत्ती असणाऱ्या शक्तीने देशातील विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या नीट परीक्षेत मोठा घोळ केला आहे. यामुळे गोरगरीब आणि कष्टकरी विद्यार्थ्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य राज्यांमध्ये नीट परीक्षेचा पेपर फोडून मोठ्या प्रमाणात गुणांची गोळाबेरीज करण्यात आली आहे. अपेक्षित नसणारे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त झाले असल्याने देशातील गोरगरीब आणि कष्टकरी विद्यार्थी हदबल झाले आहेत. ज्या केंद्रामध्ये असा प्रकार झाला आहे त्या केंद्रातील परीक्षा पुन्हा घेण्यात येऊन देशातील डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी आयुब पठाण यांनी केली आहे.

# माजलगाव तालुक्यात खरीपाच्या पेरणीला वेग

## मागच्या वर्षी सोयबीनला भाव नसल्याने शेतकऱ्यांचा कापूस लागवडीकडे कल

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यात दि ८,९ व १० जुन रोजी पावसाने दमदार हजेरी लावल्याने खरीप पेरणीसाठी शेतकर्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.या पावसावर कापुस,तुर,मुग, बाजरी व सोयाबीन लागवडीला वेग आला आहे.

माजलगाव तालुक्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने जनता उकाड्याने हैराण झाली होती.या पावसाने मोठा दिलासा मिळाला आहे.दि ०८,०९ व १० जुन रोजी रात्री पासूनच जोरदार पावसाला सुरूवात झाली. जवळपास दीड ते दोन तास दमदार पाऊस झाला.नंतर रात्री संततधार पाऊस झाला.नुकत्याच लागवड झालेल्या पिकांसाठी हा पाऊस फायद्याचा ठरणार आहे. पहिलाच पाऊस असल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला होता. परिणामी वीजपुरवठा रात्रभर खंडित झाला होता. त्यामुळे तालुक्यातील गावातील ग्रामस्थांचे हाल झाले.पावसाने कुठलीही हानी झाली नसल्याचे



सांगण्यात आले.हा पाऊस मशागतीला पूरक झाल्याने कापुस,तुर,मुग,बाजरी व सोयाबीन पेरणीसाठी शेतकर्यांची लगबग सुरु झाली होती. आणखी एक चांगला पाऊस झाला की राहिलेल्या खरीप हंगामातील पेरणीला वेग येणार आहे.दि ०८,०९ व १० जुन रोजी पाऊस झाल्याने शेतकर्यांनी तालुक्यातील कृषी सेवा केंद्रावर बी-बियाणे खरेदीसाठी गर्दी केली.लवकरात लवकर कापुस लागवड झाली पाहीजे म्हणून मजूर वर्गाकडे देखील गर्दी झाली.तालुक्यात यंदा प्रथमच कापसाची लागवड जास्त प्रमाणात दिसून येत. ६०% टक्के क्षेत्र कापसाने व्यापले आहे.त्या पाठोपाठ सोयाबीन क्षेत्रावर पेरणी होणार असल्याचे दिसून येत आहे.मागील वर्षी ३५०० ते ३८०० पर्यंत सोयाबीनला दर मिळाला होता. पण मागील वर्षात सोयाबीन दर जैसे थे असल्याने शेतकर्यांचा कापुस लागवडीकडे कल दिसून येत आहे.

## किमया अंबाड हिने नीटमध्ये ६४६ गुण संपादन केल्यामुळे राजकिशोर मोदी यांच्या वतीने सन्मान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नुकत्याच देशभरात नीट च्या परीक्षेचे निकाल जाहीर करण्यात आले. अंबाजोगाई शहरात देखील नीट परीक्षेत अनेक विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्येच शहरातील कु किमया वैजनाथ अंबाड या विद्यार्थिनीने नीट परीक्षेत ७२० पैकी ६४६ गुण मिळवल्यामुळे त्या विद्यार्थिनीचा राजकिशोर मोदी यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. सत्कार करताना किमया हिला फेटा बांधून शाल व पुष्पगुच्छ देऊन तिला गौरविण्यात आले. याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष मनोज लाखेरा,महादेव आदमाणे, विजय रापतवार,खलील जाफरी, अस्लम शेख, यांच्यासह कु किमया हिचे पालक वैजनाथ अंबाड, बालाजी अंबाड हे उपस्थित होते.

कु. किमया हिचे इयत्ता दहावी पर्यंतचे शिक्षण हे न्यू व्हिजन पब्लिक स्कुल येथे झाले होते तर राजश्री शाहू महाविद्यालय लातूर इथे संपन्न झाले.



अथक परिश्रम व वेळेवर तसेच नीटनेटका अभ्यास तसेच गुरुजनांचे योग्य मार्गदर्शन केल्यामुळे आज मी हे यश संपादन करू शकल्याची कबूली कु किमया हिने दिली. या सन्मान सोहळा प्रसंगी राजकिशोर मोदी यांनी कु किमया व तिच्या पालकांचे अभिनंदन केले. आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थी आपल्या जीवाचा आटापिटा करतांना दिसून येत आहेत. बारा बारा सोळा सोळा तास अभ्यास करून विद्यार्थी अभ्यास करून या स्पर्धेत टिकण्यासाठी धडपड करताना दिसत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी बोलताना सांगितले. विद्यार्थ्यांचे पालक देखील त्यांना वेळोवेळी सहकार्य करत असून पालकांची देखील जणू काही परीक्षाच असल्याचे चित्र निर्माण होतांना दिसत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतांना राजकिशोर मोदी यांनी यापुढील शैक्षणिक काळात कसलीही अडचण येऊ देणार नसल्याची ग्वाही याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी यावेळी दिली. या सन्मानपर कार्यक्रमाचे संचलन शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे विजय रापतवार यांनी केले तर आभार महादेव आदमाणे यांनी व्यक्त केले.

## कंत्राटी कामगारांचे महावितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन



माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील माजलगाव उपविभाग,धारूर उपविभाग व केज उपविभाग येथील महावितरण मध्ये काम करणारे बाह्यस्त्रोत यंत्रचालक व तंत्रज्ञ या कामगारांचे गेल्या दोन महिन्यापासून पगार न झाल्यामुळे कामगारांनी काम बंद आंदोलनाचा पवित्रा घेतला.या आंदोलनात महाराष्ट्र स्टेट एलेक्ट्रीसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेनेच्या वतीने दि १३ जुन गुरुवार रोजी बाह्यस्त्रोत कामगारांचे धरणे आंदोलन बीड येथील महावितरण कार्यालयासमोर करण्यात आली.

या तिन्ही उपविभागात काम करणाऱ्या जवळपास ८५ कामगारांचा माहे एप्रिल व मे चा पगार संबधित कंत्राटदारा मार्फत करण्यात आला नाही.त्यामुळे बाह्यस्त्रोत कामगारांना असंख्य अडचणीणा सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे दि.१० जुन रोजी अधीक्षक अभियंता यांना संघटनेमार्फत व वैयक्तिक सर्व कामगारांचे पत्र देण्यात आले होते तरीही पगार न झाल्यामुळे दि १३ जुन गुरुवार रोजी संघटनेच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले.याआंदोलना मध्ये सर्व कामगार व महाराष्ट्र स्टेट एलेक्ट्रीसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेचे अंबाजोगाई विभागीय अध्यक्ष कॉम्रेड शेख अखिल यांच्यासह सर्व कामगार उपस्थित होते.

## सामाजिक कार्यकर्ते जहांगीर पठाण यांच्यावर प्राणघातक हल्ला ;सहा जणांवर गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे जुन्या भांडणाच्या कारणा वरून सामाजिक कार्यकर्ते जहांगीर पठाण यांच्यावर सहा जणांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना सोमवारी दुपारी अंबाजोगाई शहरात घडली. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी फरार आहेत. या विषयी प्राप्त माहीती अशी की, येथील सामाजिक कार्यकर्ते व सदर बाजार येथील रहिवासी शराफत मिरखॉन तय्यब मिरखान उर्फ जहांगीर पठाण हे दि. ११.०६.२०२४ रोजी १२.०० वाजता एक विवाह समारंभ आटोपून केशव नगर मार्गे आपल्या घरा कडे येत असताना खोलेश्वर महाविद्यालयाच्या मागील गेट जवळ सोहेल कुरेशी रा. बाराभाई गल्ली अंबाजोगाई, आकाश नेहरकर उर्फ बिलाल रा. गांधी नगर, सय्यद मंहमद रा. झारे गल्ली, माजेद कुरेशी उर्फ माजु रा. बाराभाई गल्ली अंबाजोगाई जि. बीड, नुमान कुरेशी रा. बाराभाई गल्ली व एक अनोळखी इसमाने शराफत मिरखॉन तय्यब मिरखान उर्फ जहांगीर पठाण यास पाठीमागून येऊन त्यांची लाल रंगाची कार जहांगीर यांच्या





मोटार सायकलला आडवी करुन आरोपी सोहेल कुरेशी याने जहांगीर यास तु खुप माजला आहेस तुझ्या भावाने आमच्यावर केस केली तु आज आमच्या कचाट्यात सापडलास आम्ही तुला जिवंत सोडणार नाहीत असे म्हणुन शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात लोखंडी रॉडने (टांबी) ने मारले तर आकाश नेहरकर याने त्यांचे हातातील कोयत्याचे मुठीने डोक्यात पाठीमागुन जोरात मारले आरोपी सय्यद महंमद याने त्याच्या हातातील लोखंडी रॉडने उजवे पायाच्या नडगीवर जोरात मारले व आरोपी माजेद कुरेशी याने त्याच्या हातातील कोयत्याने डावे पायाच्या नडगीवर मारुन गंभीर जखमी केले, या सर्वांसह एका अनोळखी इसमाने लाथाबुक्याने मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिली व जहांगीर यांचा मोबाईल घेऊन आपटुन व मोटार सायकलचे नुकसान केले म्हणुन सोहेल कुरेशी रा. बाराभाई गल्ली अंबाजोगाई, आकाश नेहरकर उर्फ बिलाल रा. गांधी नगर, सय्यद मंहमद रा. झारे गल्ली, माजेद कुरेशी उर्फ माजु रा. बाराभाई गल्ली अंबाजोगाई जि. बीड ◀◀ पान ३ वर

## सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी जातीचं राजकारण थांबवा - अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून महाराष्ट्रात ओळखला जातो बीड जिल्ह्याला वारकरी सांप्रदायाची, संत, महंताचे मार्गदर्शन मिळते या ठिकाणी सर्वजन धर्मनिरपेक्षतेने राहतात. परंतु गेल्या काही दिवसापासून बीड जिल्ह्यामध्ये जातीयवाद भक्कम करण्याचे काम काही विशिष्ट समाजाचे लोक करत असल्याचे दिसून येते. त्यामध्ये आपल्या नेत्याला खुश करण्यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून आक्षेपार्ह प्रतिक्रिया देत जातीय तेढ वाढविण्याचे प्रमाण कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. निश्चित निवडणुकीमध्ये जय पराजय होत असतो परंतु त्याला जातीय दृष्टिकोनातून पाहण्यापेक्षा किंवा जातीचे राजकारण करण्यापेक्षा विकासाच्या मुद्द्यावर राजकारण होणे अपेक्षित होते परंतु तसे न होता २०२४ च्या निवडणुका या जाती आधारावर झाले असल्याचे दिसून येते. याचा उद्रेक होऊ न देण्यासाठी सर्व समाजाने सतर्क राहावे आणि आपल्या मुलांना काही दिवस सोशल मिडियापासून दूर ठेवावे असे आवाहन वंचितचे अजय सरवदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

### मागासवर्गीयांनी कोणत्याही समूहावर प्रतिक्रिया देऊ नये

जातीय तेढ कायम ठेवत विधानसभा लढवायची मानसिकता ठेवणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी सर्वसामान्य तरुणांचा वापर करणे थांबवावे निवडणुकीत जय-पराजय होत असतो परंतु एखाद्या गोष्टीची खुन्नस ठेवू नये. अनुसूचित जातीतील बांधवांनी घडत असलेल्या प्रकारावर कसलीही प्रतिक्रिया देऊ नये अन ॲट्रॉसिटी ॲक्टचा गैरवापर करणाऱ्या पुढाऱ्यापासून दूर राहावे तरच सामाजिक सलोखा अबाधित राहील.

## विद्यार्थ्यांनी पालक-शिक्षकांच्या श्रमांचे मोल विसरू नये -अनिलदादा जगताप

### अनिलदादा फाउंडेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार कार्यक्रम संपन्न!

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या जीवनाला व करिअरला निर्णायक वळण देणारा महत्वाचा टप्पा म्हणजे इयत्ता १० वी आणि १२ वी ची परीक्षा असते. नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता १० वी आणि १२ वीच्या निकालात बीडमधील विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करत नावलौकिक मिळवला आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने दि. ११ जून २०२४ रोजी सायं ५.०० वाजता बीड शहरातील हॉटेल नीलकमल, बीड




येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार या कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिलदादा जगताप फाउंडेशनचे कार्यवाहक प्रतिक कांबळे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रस्ताविकात अनिलदादा जगताप फाउंडेशन हे अनिलदादा यांनी आजवर केलेल्या जनसेवेच्या कार्यास आणि त्यांच्या विचारांना प्रेरित होऊन स्थापन केले असल्याची माहिती दिली. याबरोबरच अनिलदादा फाउंडेशन स्थापनेचा उद्देश स्पष्ट करून इथून पुढे समाजपयोगी कामात फाउंडेशन सक्रिय सहभाग घेणार असल्याचे सांगितले. या बरोबरच या अनिलदादा फाउंडेशनशी बीडमधील तरुण वर्ग मोठ्या संख्येने जुळत असल्याचे देखील सांगितले.

या कार्यक्रमात इयत्ता दहावी आणि बारावीच्या तब्बल दीडशे गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा नागरी सत्कार करण्यात आला. याबरोबरच शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांना देखील सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून गंमतभाऊ भंडारी संपादक दै पार्श्वभूमी यांची उपस्थिती होती. याबरोबरच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, डॉ विक्रम सारुक ◀◀ पान ३ वर

## मंगळवार १८ जून रोजी महिला लोकशाही दिन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा स्तरावर महिलांसाठी लोकशाही दिन महिन्याच्या तिस-या सोमवारी आयोजित करण्यात येतो या लोकशाही दिनामध्ये शासन आदेशान्वये महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी, व्यासपीठ मिळण्यासाठी, त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो.

तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचा चौथा सोमवार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १८ जून २०२४ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणा-या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय बीड येथे दाखल करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास विभागाने केले आहे.

## आत्महत्याग्रस्त तरूणांच्या कुटुंबियांना गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान देणार मदतीचा हात

### जीव देऊन भागणार नाही बाळांनो.. माझी शपथ आहे तुम्हाला, स्वतःच्या जीवाचं बरंवाईट करून घेवू नका - पंकजाताई मुंडे यांची हळहळ

बीड । प्रतिनिधी

लोकसभेत झालेला पराभव जिव्हारी लागल्याने काही ठिकाणी तरूणांनी आत्महत्या केल्याच्या प्रकाराबद्दल भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी गंभीर चिंता व्यक्त करून हळहळ व्यक्त केली आहे. मी हात जोडून तुम्हाला विनंती करते, असा जीव देवून भागणार नाही बाळांनो..माझी शपथ आहे तुम्हाला स्वतःच्या जीवाचं काहीही बरं वाईट करून घेऊ नका असं आवाहन पुन्हा एकदा त्यांनी केलं आहे. दरम्यान आत्महत्या केलेल्या तरूणांच्या मुला बाळांचं पालनपोषण करण्याची जबाबदारी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानने घेतली असून लवकरच त्यांना मदत दिली जाणार आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणूकीत पंकजाताई मुंडे यांचा अगदी थोडया मतांनी पराभव झाला पण हा पराभव सहन न झाल्याने काही ठिकाणी तरूणांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या. मन सुन्न करणाऱ्या या घटनांनी पंकजाताई मुंडे यांनी तरूणांच्या कुटुंबीयांशी तात्काळ दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांच्या प्रती संवेदना व्यक्त केल्या. घरातील तरूणांनी आत्महत्या केल्याने त्यांच्या कुटुंबीयांच्या पालनपोषणाची जबाबदारी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानने घेतली आहे, त्यांना प्रतिष्ठान मार्फत मदत दिली जाणार आहे.

माझी शपथ आहे तुम्हाला, स्वतःच्या जीवाचं बरंवाईट करून घेवू नका

पंकजाताई मुंडे यांनी एक व्हिडिओ शेअर करून तरूणांना आवाहन केलं आहे. त्या म्हणाल्या, काय बोलू, मी तुमच्या सगळ्यांशी हे कळत नाही. मी आवाहन केले, माझं आवाहन तुमच्या दुःखाच्या, नैराश्याच्या पलीकडे ते आवाहन पोहोचत नाही की काय, असं दिसत नाही. गेल्या काही दिवसांत ज्या तरुणांनी आत्महत्या केल्या, या घटनांनी मी जेवढी खचले तेवढं कदाचित कोणी कोणी खचलं नसेल. मी अहमदपूरमधल्या त्या तरुणाच्या आईशी बोलले, ती माऊली म्हणाली की, ताई तुम्ही टेन्शन घेऊ नका, त्याचा तुमच्यावर खूप जीव होता. इतकं प्रेम याला मला शब्द सापडत नाहीत.



कदाचित तुम्ही माझ्यावर अघोरी प्रेम करताय. प्रत्येकक्षणी एक-एक कर्ज माझ्यावर चढवत आहात.तुम्ही मला पाहिलंय, गेली २०-२२ वर्षात, मुंडे साहेबांसारख्या

पहाडासारख्या नेत्याला मी भावनिक होताना पाहिलं आहे, मी त्यांना आधार दिला. मी त्यांना आधार देण्याइतकी मोठी नाही. पण मी आधार द्यायचा भाव आणला, कारण त्यांना वाटायला नको की,आपल्याला मुलगी आहे आणि ती खूप कोमल आहे. नाही बाबा, मी

खूप कठीण आहे, कर्मठ आहे, मी तुमच्यासाठी लढायला मागे

हटणार नाही. ४ जूनला मुंडेसाहेब गेले तो दिवस आठवा, दगडं पडत होती सगळ्यांच्या डोक्यावर, पण मी धावत जाऊन माईक हातात

घेतला, जीवाची पर्वा केली नाही. कोणाचाही विचार केला नाही,विचार केला समाज चेंगरेल, अनेक जीव जातील, याचा केला. तेव्हा मी तुम्हाला मुंडे साहेबांची शपथ दिली, ती शपथ तुम्ही पाळली. आता जे काही झालं ते तुमच्या जीवाला लागलं आहे, पण तुम्ही असं जिव्हारी लावून घेणार असाल आणि अशा रस्त्यावर जाणार असाल तर, माझी शक्ती बनण्यापेक्षा असं पाऊल उचलणार असाल तर मला राजकीय पाऊल उचलताना मला प्रश्न पडतो.माझ्या राजकारणात स्वार्थ नाही, माझं आजपर्यंतचं राजकारण उद्देशाचं होतं, जेव्हा पद मिळालं तेव्हा गरिबांसाठी काम केलं, नाही मिळालं तेव्हा ती गोष्ट हसतखेळत झेलली. हे राजकारण आहे, राजकारणात अशी वेळ येत असते. आतापर्यंतच्या इतिहासात थेटपणे एखाद्या व्यक्तीला, वर्णाला हीन लेखून प्रचार झाला नाही, ते तुमच्या जिव्हारी लागलं आहे, हे मला माहिती आहे. आपल्याला वंचितांचा आवाज बनायचं आहे, आपल्याला त्या सगळ्यांना ताकदी देणारी फौज बनायचं आहे. असं जीव देऊन भागणार नाही रे बाळांनो, मग मी कसं काम करु, मी तुम्हाला हात जोडून विनंती करते, मी तुमच्याकडे यायलेय, पण माझा पायच उचलत नाही, सांत्वनासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. मी येत आहे. कृपा करुन माझी शपथ आहे तुम्हाला, मी साहेबांची शपथ घालून पाहिली, पण स्वतःच्या जीवाला काही करुन घेऊ नका, असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# विमान वाहतूक क्षेत्रात पुण्यासह महाराष्ट्र देशाची सेवा करायचीय : मंत्री मोहोळ

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

नागरी उड्डायण क्षेत्रातील नवनवीन आव्हानांचा अभ्यास करून आपल्याला पुण्यासह महाराष्ट्र आणि देशासाठी चांगले काम करायचे आहे, असा संकल्प केंद्रीय नागरी उड्डायण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज (दि.१३) व्यक्त केला. पहिल्यांदाच खासदार आणि थेट केंद्रीय राज्यमंत्री झाल्यामुळे माझ्यावर मोठी जबाबदारी असल्याचे त्यांनी म्हटले.



नागरी उड्डायण खात्याचे राज्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेताच मोहोळ यांनी आपल्या खात्यातील अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. त्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. मोहोळ म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात नागरी उड्डायण क्षेत्रात अतिशय चांगले काम झाले. ही सर्व कामे आणि या क्षेत्रातील आव्हानांचा अभ्यास करून देशाची सेवा करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे.राज्यातील विमान वाहतूक वाढविण्यासाठी पुरंदर आणि नवी मुंबई विमानतळ उभारण्याचे काम वेगाने पूर्ण केले जाईल. पुणे विमानतळाच्या विस्ताराचे कामही झटपट पूर्ण केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.ङ्गपुण्याच्या महापौरपदी असताना पुणे विमानतळाशी संबंधित विषय घेऊन दिल्लीत आलो होतो. त्यावेळी नागरी उड्डायण खात्यातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. मात्र, एक दिवस या खात्याचा राज्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेईल, असे स्वप्नातही कधी वाटले नव्हते, अशी आठवण मोहोळ यांनी सांगितली.

## विजेच्या धक्क्याने आई, मुलाचा मृत्यू

चाकण । प्रतिनिधी

खराबवाडी (ता. खेड) येथे राहत्या घराच्या टेरेसवरील घरासाठी असलेल्या विद्युत सर्व्हिस वायरमधील विद्युत प्रवाहाचा धक्का बसल्याने आई, मुलाचा मृत्यू झाला. पल्लवी गिरीश जाजू (वय ३५), समर्थ गिरीश जाजू (वय १४) अशी मृत्यू पावलेल्या आई व मुलाचे नाव आहे.

ही घटना मंगळवारी (ता. ११) दुपारी दोनच्या सुमारास घडली. इमारतीच्या टेरेसचा दरवाजा आतून बंद असल्याने ही घटना शेजारील लोकांना कळली नाही. काही तासाने दरवाजा तोडल्यानंतर ही घटना उघडकीस आली. या घटनेचा पंचनामा वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन केला. अशी माहिती वीज कंपनीचे शाखा अभियंता विक्रांत वरुडे यांनी दिली.

## पोर्शे अपघात प्रकरण :अनिल देशमुखांचे सरकारवर गंभीर आरोप

पुणे । प्रतिनिधी

येथे झालेला पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीला वाचण्यासाठी प्रयत्न राज्य सरकार करत आहे, असा आरोप शरद पवार गटाचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला आहे.



पुणे अपघात प्रकरणासंदर्भात अनिल देशमुख यांनी आपल्या 'द' अकाउंटवर ट्वीट करत सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे, पुणे हिट न्ड रन प्रकरणामध्ये राजकीय दबावाखाली आरोपीचे रक्ताचे नमुने बदलून आरोपी दारू न पिल्याचा अहवाल तयार करण्याचे प्रयत्न झाले, हे उघड झाले आहे. आता माजी गृहमंत्री म्हणुन माझी माहिती अशी आहे की, अपघातात मृत्यू झालेले तरुण आणि तरुणीच्या व्हिसेरा रिपोर्टमध्ये -श्रलेहेश्र +ींश यावे याकरिता पूर्णपणे तयारी झाली आहे. जेणेकरुन या प्रकरणामध्ये मृत झालेले मोटरसायकलवरील तरुण आणि तरुणी हे दारु पिऊन होते आणि त्यांच्यामुळेच हा अपघात झाला, असे न्यायालयात सिद्ध करता येईल. जेणेकरून विशाल अग्रवालचा मुलगा लवकर सुटेल, अशा पध्दतीने प्रयत्न सध्या सरु आहेत.

## सासवडला आळंदी देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांची भेट

सासवड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आषाढ वारीसाठी सासवड येथे २ जुलैला येत असून त्याच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात येणार आहे. गुरुवारी (ता. १३) सोहळयाच्या निमित्ताने आळंदी देवस्थान समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सासवड पालखी तळावर भेट देऊन पाहणी करून काही सूचना केल्या.

यावेळी आळंदी संस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, बाळासाहेब चोपदार उपस्थित होते. तसेच तहसीलदार विक्रम राजपूत, सासवड नगर पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, पोलिस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, सासवड नगरपालिका आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण, पंचायत समिती आरोग्य विभागाचे आरोग्य निरीक्षक राहुल टकले, तलाठी सुधीर गिरमे, माजी उपनगराध्यक्ष यशवंतकाका जगताप, संतोष गिरमे, संभाजी जगताप, नगर अभियंता जावेद मुल्ला, कार्यालयीन अधीक्षक उत्तम सुतार, विद्युत विभाग प्रमुख सुलोचना हर्षे, राजेंद्र जाधव, शहाजी सस्ते यावेळी उपस्थित होते.

सासवडच्या पालखी तळाच्या व्यवस्थेबद्दल समितीने समाधान व्यक्त करत कऱ्हा नदीवरील पुलाच्या पुढचे अपूर्ण काम सोहळ्यापूर्वी पूर्णत्वाला जाईल, असे देवस्थानचे वीर यांनी सांगितले. महामार्गावरील भू संपादन प्रश्न मार्गी लागला असून येत्या २५ जूनपर्यंत पालखी महामार्गावरील कामे पूर्ण करण्याबाबत सूचना त्यांनी केल्या.

## पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेत सहभागी होण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

पुणे । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारीत फळपिक विमा योजना २०२४-२५ व २०२५-२६ च्या मृग बहारासाठी डाळिंब, पेरू, चिकु, लिंबू, संत्रा, मोसंबी, सिताफळ व द्राक्ष या ८ फळपिकांना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने केले आहे.

नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास संरक्षण देणारी ही योजना असून नुकसानीच्या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधीत राखण्यास मदत होते. प्रधानमंत्री पीक विमा योजना कर्जदार तसेच बिगरकर्जदार शेतकऱ्यांना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी ऐच्छीक आहे. उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षणाचे कवच लागू राहणार आहे. या योजनेत नुकसान भरपाई महावेध प्रकल्पांतर्गत महसूल मंडळस्तरावरील स्वयंचलित हवामान केंद्राच्या आकडेवारीनुसार ठरविण्यात येणार असून त्यामुळे मानवी हस्तक्षेप राहणार नाही.

डाळिंब फळपिकासाठी खेड, दौंड, आंबेगाव, बारामती, जुन्नर, इंदापूर, पुरंदर, शिरूर व हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सहभागासाठी अंतिम मुदत १४ जुलै असून विमा संरक्षित रक्कम १ लाख ६० हजार रुपये तर शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता ८ हजार रूपये असा आहे. पेरू फळपिकासाठी इंदापूर, खेड, पुरंदर, हवेली, भोर, बारामती, दौंड व शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सहभागाची अंतिम मुदत २५ जून आहे. चिकू पिकासाठी आंबेगाव, इंदापूर, दौंड, भोर, जुन्नर, पुरंदर, शिरूर व बारामती तालुके अधिसूचित असून सहभागाची अंतिम मुदत ३० जून आहे. सिताफळ पिकासाठी आंबेगाव, इंदापूर, खेड, जुन्नर, दौंड, पुरंदर, बारामती, भोर, शिरूर व हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सहभागासाठी अंतिम मुदत ३१ जुलै आहे. या तिन्ही पिकांसाठी विमा संरक्षित रक्कम ७० हजार आणि शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता ३ हजार ५०० रूपये असा आहे. लिंबू फळपिकासाठी इंदापूर, शिरूर, बारामती व दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सहभागासाठी अंतिम मुदत २५ जून असून विमा संरक्षित रक्कम ८० हजार तर शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता ४ हजार रूपये असा आहे. संत्रा पिकासाठी शिरूर तालुका अधिसूचित असून सहभागाची अंतिम मुदत २५ जून तर मोसंबी पिकासाठी इंदापूर व शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सहभागासाठी अंतिम मुदत ३० जून आहे. दोन्ही पिकांसाठी विमा संरक्षित रक्कम १ लाख रूपये आणि शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता ५ हजार रूपये असा आहे.द्राक्षे क फळपिकासाठी इंदापूर, बारामती व आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सहभागासाठी अंतिम मुदत २५ जून असून विमा संरक्षित रक्कम ३ लाख ८० हजार रूपये तर शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता १९ हजार रूपये असा आहे. शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स या कार्यान्वयीत विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांक १८०० २०९५९५९ किंवा ई-मेल आयडी bagichelpbajajallianz.co.in वर संपर्क साधून सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे.

## चांदणी चौकात एसटी बसची वाहनांना धडक; तीन जखमी, एक गंभीर



पुणे । प्रतिनिधी

चांदणी चौकातून कोथरूडच्या दिशेने येणाऱ्या मालवाहतूक करणाऱ्या बसनं वेगानं रस्ता ओलांडत असताना काही वाहनांना धडक दिली. यामध्ये एक महिला गंभीर जखमी आणि इतर दोन जण जखमी झाले आहेत.

कोथरूड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संदीप देशमाने यांनी सांगितले की, चांदणी चौकातील उतारावरून कौथरूडच्या दिशेने निघालेल्या बसनं रस्ता ओलांडून अनेक वाहनांना धडकली. त्यामध्ये काही जण जखमी झाले आहेत. या अपघाताची आम्ही माहिती घेत आहोत. अपघातानंतर जी वाहतूक कोंडी झाली ती सोडवण्यासाठी व्यस्त असल्याचं पोलिसांनी सांगितलं. जखमींना दवाखान्यात नेण्यात आलं आहे.

## मंगळवार पेठेत तिघांकडून दहशत

### मारहाण करीत, धाक दाखवून एकास लुटले

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात गुन्हेगारीने कळस गाठला असून शहरातील अनेक भागातून गुन्हेगारीच्या घटना समोर येत आहेत. अशीच एक घटना मंगळवार पेठेतून समोर आली. दुचाकीवरून लोखंडी रॉड घेऊन आलेल्या अनोळखी तिघांनी एकास कानाखाली चापट मारून 'तेरे पास जितने भी पैसे है, जल्दी निकाल'याकडे दुर्लक्ष करत निघून जाता असताना परत कानाखाली चापट मारून रोख रक्कम काढून घेतल्याचा प्रकार समोर आला. दरम्यान हातातील लोखंडी रॉड हवेत फिरवत कोणी समोर आल्यास 'एक एक को खल्लास कर देंगे'म्हणत परिसरात दहशत निर्माण केली.हा प्रकार बुधवार (दिं. १२) रोजी सदानंदनगर बिल्डींग जवळीत श्री निवा अपार्टमेंट जवळ हिंदू राष्ट्र मंडळाच्या कट्ट्यावर मंगळवार पेठ येथे घडला.

याप्रकरणी शाहरुख फय्याज खान (वय.२९, रा. बी विंग, दुसरा मजला,फ्लॅट नं.२३८, सदाआनंद नगर न्यु मंगळवारपेठ, पुणे) यांनी समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यावरून पोलीसांनी तीन अनोळखी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला.

मिळालेल्या माहितीनुसार, लोखंडी रॉड हातात घेत तीन अज्ञात आरोपी आपल्या दुचाकीवरून बुधवार (दि.१२) रोजी फिर्यादी खान यांच्याजवळ आले.यावेळी फिर्यादी यांच्या कानाखाली चापट मारत तेरे पास जितने भी पैसे है, जल्दी निकाल असे म्हणत धमकी दिली. यावेळी फिर्यादी यांनी आरोपीच्या या धमकीकडे दुर्लक्ष करत ते तेथून निघून जात असताना आरोपींनी त्यांच्या पुन्हा कानाखाली चापट मारली आणि त्यांच्या खिशातील ७५० रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. तसेच फिर्यादी खान यांच्या रिक्षासह इतर दोन रिक्षा व दोन दुचाकींची आरोपींनी तोडफोड करून नुकसान केले व हातातील लोखंडी रॉड हवेत फिरवत कोई सामने आया तो फोड के रख देंगे, एक एक को खल्लास कर देंगे असे म्हणून परिसरात दहशत निर्माण केली. दरम्यान, समर्थ पोलीसांनी याप्रकरणी तीन अज्ञात आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करून घेतला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## राज्य उत्पादन शुल्कच्या छाप्यात शिक्रापूर येथे ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

पुणे । प्रतिनिधी

राज्य उत्पादन शुल्काच्या भरारी पथक क्र.१ च्यावतीने शिरुर तालुक्यातील शिक्रापूर गावातील वेळ नदीकाठी अवैधरित्या गावठी दारुनिर्मिती करणाऱ्या अड्ड्यावर कारवाई करुन १ हजार ३०० लिटर रसायन व ७० लिटर गावठी दारु असा ५९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी आरोपी अरमान कंकराज बिरावत याच्या विरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १. पुणे पथकाचे निरीक्षक देवदत्त पोटे, दुय्यम निरीक्षक डी. एस. सुर्यवंशी तसेच जवान सूरज घुले, जयराम काचरा, मुकुंद पोटे, शरद हांडगर, शाहिन इनामदार यांनी सहभाग घेतला. नागरिकांना अवैध मद्य निर्मिती, विक्रीबाबत माहिती मिळाल्यास राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक चरणसिंग राजपूत यांनी केले आहे.

## विनापरवाना शॉपिंग मॉलवर कारवाई

पुणे । प्रतिनिधी

फर्ग्युसन रस्त्यावर शिरोळे प्लॉटमधील विनापरवाना मॉल पाडण्यासंदर्भातील स्थगिती उठताच सात हजार चौरस फूटाचे स्ट्रक्चर काढले

फर्ग्युसन रस्त्यावरील शिरोळे प्लॉटवरील विनापरवाना शॉपिंग मॉल पाडण्याचे काम सुरू असतानाच न्यायालयाने स्थगिती आदेश दिले होते. मात्र न्यायालयाने ही स्थगिती उठवताच महापालिकेच्या बांधकाम विभागाने मंगळवारी (दि. ११) उर्वरीत मॉलही पाडून टाकला.

शिरोळे प्लॉटवर लोखंडी स्ट्रक्चरमध्ये दुमजली शॉपिंग मॉल उभारण्यात आला होता. सुमारे १२ हजार चौरस फूटाच्या या मॉलमध्ये पत्र्यांचे पार्टिशन करून ७० स्टॉलवजा दुकाने सुरू करण्यात आली होती. या मॉलसाठी महापालिकेच्या बांधकाम विभागाची कोणतीही परवानगी घेतलेली नव्हती. त्यामुळे महापालिकेने आठ वर्षांपूर्वी नोटीस बजावत मॉल काढून टाकण्याचे आदेश दिले होते. याविरोधात संबधित व्यावसायिकाने न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने मागील वर्षी सदर कारवाईला स्थगिती दिली होती. मात्र न्यायालयाने ही स्थगिती उठविल्यानंतर महापालिकेच्या वतीने तातडीने कारवाई करून सुमारे सात हजार चौरस फुटांचे स्ट्रक्चर काढून घेण्यात आले

मंगळवारी महापालिकेची कारवाई सुरु असतानाच न्यायालयात गेलेल्या व्यावसायिकाने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर पुन्हा स्थगिती आदेश देण्यात आला. यामुळे उर्वरित कारवाई होऊ शकली नव्हती. उच्च न्यायालयाने ही स्थगिती उठवल्यानंतर महापालिकेच्या यंत्रणेने मॉलचे उर्वरीत लोखंडी अँगल व पत्र्याचे स्ट्रक्चर पाडून टाकले. मॉलमुळे फर्ग्युसन रस्त्यावर वाहतुकीचा ताण येत होता. तसेच मॉलमध्ये हवा आणि उजेडाची सोय नसल्याने आगीसारखी दुर्घटना घडली असती तर मोठ्या प्रमाणात जिवितहानी झाली असती. महापालिकेच्या बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश बनकर, कार्यकारी अभियंता बिपीन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअभियंता सुनील कदम, शाखा अभियंता राहुल रसाळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

वडगाव शेरीतही कारवाई

बांधकाम विभाग झोन क्रमांक चारअंतर्गत पुणे पेठ वडगाव शेरी सर्व्हे क्रमांक ३४ येथे कारवाई करण्यात आली. इमारतीच्या सामासिक अंतरातील सुमारे १,५०० चौरस फूट कच्चे-पक्के अनधिकृत पत्रा शेड तसेच लोहगाव परिसरातील कलवड वस्ती वस्ती सर्व्हे क्रमांक २५९ येथील नाल्यावरील अतिक्रमित बांधकामामावर कारवाई करण्यात आली. त्याचबरोबर सुमारे ९,५०० चौरस फूटाच्या अनधिकृत धार्मिक शेडवरदेखील कारवाई करण्यात आली. अशाप्रकारे वडगाव शेरीत एकूण ११ हजार चौरस फूट अनधिकृत पत्रा शेड आणि कच्च्या-पक्क्या बांधकामावर कारवाई करण्यात आली.

## डबक्यात पडून चिमुरड्याचा मृत्यू

पिंपरी । प्रतिनिधी

घराच्या अंगणात खेळत असताना पावसाच्या पाण्याने भरलेल्या डबक्यात पडून तीन वर्षाच्या चिमुरड्याचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. १०) दुपारी अडीचच्या सुमारास चक्रपाणी वसाहत भोसरी येथे घडली. गणेश बालाजी मंजलवार (वय ३) असे मृत्यू झालेल्या चिमुरड्याचे नाव आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन फटांगरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंजलवार कुटुंबीय भोसरी येथील चक्रपाणी वसाहतीमध्ये राहतात त्यांच्या घरासमोरील मोकळ्या मैदानात मोठ-मोठे खड्डे पडले असून त्यामध्ये पावसाचे पाणी साचले आहे. दरम्यान, सोमवारी दुपारी अडीचच्या सुमारास चिमुरडा गणेश मित्रांसोबत अंगणात खेळत होता. त्यावेळी तोल गेल्याने गणेश डबक्यात पडला. गणेशसोबत खेळत असलेल्या मुलांनी त्याच्या आईला याबाबत माहिती दिली. आईने धावत जाऊन गणेशला डबक्याबाहेर काढले. गणेशला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. गणेशच्या मृत्यूमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली असून याबाबत अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक सुहास गाडे करत आहेत.

## छगन भुजबळ यांनी शुभेच्छा दिल्या : सुनेत्रा पवार

पुणे । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आज (दि.१३) राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या की, छगन भुजबळ नाराज नाहीत, सर्वांच्या सहमतीने हा निर्णय झालेला आहे. त्यांनी मला शुभेच्छा दिल्या आहेत.



नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्याकडून पराभव झाला होता. या पराभवानंतर त्यांना राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर झाली. त्यानंतर अजित पवार गटात नाराजीनाट्य सुरु झाले. छगन भुजबळ नाराज असल्याची चर्चा होवू लागली. दरम्यान सुनेत्रा पवार यांनी आज (दि.१३) अर्ज दाखल केला. अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलत असताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, मंत्री छगन भुजबळ यांनी मला आज शुभेच्छा दिल्या आहेत. ते नाराज नाहीत. सर्वांच्या सहमतीने मी राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्याचबरोबर पार्थ पवार यांचीही सहमती आहे.आज सकाळी माध्यमांशी बोलताना मंत्री छगन भुजबळ म्हणाले होते की, राज्यसभा पोट निवडणुकीसाठी माझ्यासह आनंद परांजपे, बाबा सिद्धी इच्छूक होते; पण चर्चेअंती सर्वांच्या मताने सुनेत्रा पवार यांना राज्यसभेसाठी उमेदवारी जाहीर केली आहे, या निर्णयामुळे मी नाराज नाही.



## 'खडकवासला'त फक्त ४.०८ टीएमसी पाणी

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील चार धरणांमध्ये मिळून सध्या फक्त ४.०८ टीएमसी पाणी शिल्लक राहिले आहे. या प्रकल्पातील पाणीसाठ्याचे हे प्रमाण अवघे १४.०१ टक्के इतके आहे. गतवर्षीच्या आजच्या तारखेच्या तुलनेत हा पाणीसाठा १.४ टीएमसी इतका कमी आहे. खडकवासला प्रकल्पात गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेला ५.४८ टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहिला होता. गतवर्षीच्या उपलब्ध पाणीसाठ्याचे हे प्रमाण १८.७८ टक्के इतके होते.